# *याचा तुला विश्वास आहे का?*

आणि प्रार्थना करण्याआधी, मला हे सांगण्यास आवडेल, त्या मागील संध्याकाळी, माझा विश्वास आहे ते होते. मी त्या महिलेस म्हणालो, “जर तू आपल्याला सूचित केले आहे तसे करशील तर ते मुलीच्या...डोक्यातले पाणी, आटेल.” आणि मुलीचे डोके, काल रात्री, दीड इंच दोरीच्या मापाने आटले आहे. म्हणून त्या महिलेने ते मूल आता येथे आणलेले आहे.

2 आता, बहिणी, मी ते केले कारण, एका उद्देशासाठी केले समजले? जर तुम्ही काही दृश्यस्वरूपात घडताना पाहू शकलात, तर ते तुमचा विश्वास वाढवते ह्यासाठी कि सातत्याने त्यावर विश्वास ठेवावा. कधीकधी मी तसे करतो केवळ, जसे मी एखाद्या व्यक्तीला सांगतो की उठ, एक किंवा दोन पाऊल उचल, तुझा हात हालव, तुझ्या बोटांची वळवळ कर, असे काहीतरी जे ते वेगळे करू शकतात, केवळ त्यांना समजविण्यासाठी की ते सर्व ठीक आहे. ते अगदी चिंताग्रस्त होतात आणि विचार करतात की तसे घडणार नाही, परंतु तसे सर्व समयी तसे घडते. समजले? तसे व्हायलाच पाहिजे.

3 किती जणांची इच्छा आहे कि आता प्रार्थनेत त्यांची आठवण करावी? तुम्ही फक्त तुमचे हात वर कराल आणि म्हणाल, “प्रभू, ती प्रदान कर”? आपण आपली मस्तके झुकवूया

4 प्रभू, जसे आम्ही चर्चचे उदात्त गाणे ऐकतो, जे माझा बहुमोल मित्र, पॉल रडर ने लिहले आहे, “फक्त विश्वास करा,” आपण आता त्या मुलाचा विचार करीत आहोत, जो, त्याच्या वडीलांच्याद्वारे शिष्यांकडे आणला होता, त्यांना भुते काढण्याचे आणि आजाऱ्यांना बरे करण्याचे सामर्थ्य देऊन दहा दिवसापेक्षा अधिक कालावधी झाला नव्हता, आणि येथे ते पूर्णपणे फेफऱ्याच्या रोग्याच्या बाबतीत अपयशी ठरले होते. आणि त्यांनी आपल्या प्रभूला येताना पाहिले. आणि पिता धावला आणि म्हणाला, “प्रभू आमच्यावर दया कर. माझ्या मुलाला सैतान पुष्कळ प्रकारे त्रास देत आहे. मी त्याला तुझ्या शिष्याकडे आणले आणि ते त्याला बरे करू शकले नाही.”

5 येशू म्हणाला, “मी करू शकतो, जर तुम्ही विश्वास ठेवाल. फक्त विश्वास.” ओह देवा, तू तेव्हापासून किंचितही बदलला नाहीस, तू अगदी तोच प्रेमळ, गोड, आणि दयाळू परमेश्वर आहे. जो तू तेव्हा होतास, तसाच तू आज आहेस. आणि प्रभू त्या पित्यासारखे, आम्ही सर्व रडतो, “प्रभू, आमच्या अविश्वासात तू सहाय्य कर.” ते इतके सोपे आहे; आम्ही नेमके त्यावर अडखळतो पित्या.

6 आम्ही तुला आभार आणि स्तुती देऊ इच्छितो मागील रात्री त्या मुलाला स्पर्श केल्या बद्दल, ते पाहून जी डोक्याची कवटी सुजली होती, ती, ते हाड बाहेर ढकलले गेले होते, ते काल रात्री अर्ध्या इंचाने खाली गेले. पित्या, आम्ही त्यासाठी तुझी उपकारस्तुती करतो. जेव्हा आम्हाला माहित आहे की आपल्या डॉक्टरांकडे संशोधनामध्ये त्यासाठी काहीच उपाय नाही, तेथे काहीच नाही जे त्यासाठी काही करू शकतील. परंतु तू आजही परमेश्वर आहेस, सर्व परिस्थितीचा स्वामी आहेस. पित्या आम्ही तुझे आभार मानतो.आम्ही ह्या आईच्या प्रामाणिकपणा, आणि गोडीबद्दल, आणि आज्ञा मानून ती दोरी परत आणल्याबद्दल आणि कागदाच्या तुकड्यावर चिकटविल्याबद्दल, येथे सर्व लोकांत तिची साक्ष देवाच्या गौरवासाठी दिल्याबद्दल तुझे आभार मानतो. तिचे लहान मुल जगो आणि सामान्य मुलाप्रमाणे, तुझ्या गौरवासाठी राहो.

7 पित्या, त्या उचललेल्या सर्व हातांकडे पहा. त्यातील प्रत्येकाची गरज आहे. माझाही वर आहे, पित्या मला गरज आहे. आणि येथे पुष्कळ जण आहेत, पत्राच्या स्वरूपात किंवा ह्या पेटीमध्ये, ते गरजू लोक जे खरोखरच गरजू आहेत. प्रभु, तसे होऊ दे. ते ह्या आईची साक्ष घेवोत. आणि फक्त एक उदाहरण म्हणून हे दाखवण्यासाठी कि जेव्हा तू काही सांगतो, ते पूर्ण होते…आम्हा…सर्वांना ते स्वीकारणे आहे आणि त्यावर कृती करणे आहे. हे पूर्ण झालेले काम आहे.

8 प्रभू, प्रदान कर, की ही प्रत्येक पत्रे आणि हे रुमाल, ज्या लोकांवर ते ठेवले जातील, त्यांना आरोग्य मिळो. प्रत्येक जण ज्यांनी त्यांचे हात वर केले आहेत, पित्या, त्यांना त्यांच्या हृदयातील इच्छा मिळो…आम्ही हे येशूच्या नावाने मागतो. आमेन. तुम्ही बसू शकता.

9 मी फक्त तुम्हाला ती दोरी येथे दाखवू इच्छितो, जि त्या स्त्रीने…तेथे तूम्ही आहात. त्या लहान मुलाचे डोके आटले आहे ज्याप्रमाणे प्रभुने पवित्र आत्म्याद्वारे काल आपणास अभिवचन दिले आहे. तो अदभुत आहे कि नाही? म्हणून, आम्हास इतके धैर्य दे की आम्हास तो विश्वास आणि भरवसा येईल.

10 आता, जेव्हा त्या झाडास म्हटले, मार्क 11:23 मध्ये, “कोणीही ह्यापुढे तुझे फळ कधीही न खावो.” तो कदाचित जोराने बोलला नसेल. असे का, प्रामाणिकपणे, त्याविषयी त्याला सहज वाटले, तोपर्यन्त त्याचे शिष्यही…मला वाटते त्यांच्यातील एकाने त्याचे ऐकले. आणि ते…जेव्हा तो फेफरेकरी, जेव्हा तो प्रभू येशुपुढे आला, त्या मुलाला सर्वात जोरात फीट आली, स्पष्टच बोलू तर तो मेल्यासारखा जमिनीवर पडला, परंतु त्याला कळले तो कोणा एकाला भेटला ज्याचा विश्वास त्या प्रेषितापेक्षा अधिक होता.

11 आता मला त्यांच्यासाठी आवडेल, जे दैवी आरोग्यामध्ये विश्वास ठेवत नाही त्यांनी हे पहावे. येशूने त्यांना दुष्ट आत्मे काढण्याचे सामर्थ्य दिले होते, आणि ते अपयशी ठरले, सामर्थ्य अपयशी ठरले नाही, परंतु ते अपयशी ठरले होते. येशूने त्यांना म्हटले:

“आपल्याला त्याला बाहेर का काढता आले नाही.”

तो म्हणाला, “तुमच्या अविश्वासामुळे.”

12 मंडळीकडे अजूनही सामर्थ्य आहे. देवाने त्याचे सामर्थ्य मंडळीकडून कधीच घेतले नाही, परंतु मंडळीकडे ते चालविण्यासाठी पूर्ण विश्वास नाही. तेच सर्व आहे. ते इतके सरळ आहे. आपण ते कधीकधी ते इतके गुंतागुंतीचे करण्याचा प्रयत्न करतो, परंतु जितकी अधिक सोपी तुम्ही सुवार्ता कराल, तितके अधिक खरेपण तुम्हाला मिळेल, तेव्हा तुम्ही त्या खऱ्या साधेपणात याल. देव तसे बोलला आहे, तेच अंतिम आहे, आणि तेच सर्व आहे. आणि त्यावर फक्त विश्वास करा, पुढे जा.

13 जेव्हा येशूने म्हटले “कोणी मनुष्य तुझे फळ ना खावो,” का, त्याची पाने जशी ती होती तशीच सुंदर आणि तेजस्वी होती. झाडाची साल पण तशीच होती, परंतु जमिनीच्या खाली त्या मुळाशी, जीवन कमी होण्यास सुरवात झाली होती.

14 तशाच प्रकारे कर्करोग आहे. कुठल्याही प्रकारचा आजार जो—ज्याचा तुम्ही विचार करून पाहाल. जेव्हा तुम्ही परमेश्वराचे वचन, खोलवर मुळातून स्विकारता, तेथे कर्करोग असो, तुमचा हात ताठ झालेला असो. त्याचे दैवि आरोग्याशी काही देणे घेणे नसते. ते “जर तुम्ही विश्वास करू शकता” समजले? कोठेतरी खाली, तेथे अगोदरच कार्य सुरु झाले आहे.

15 येशूने म्हटले, "जर तू ह्या डोंगराला, तू उपटून समुद्रात टाकला जा असे म्हणेल, आणि आपल्या अंत:करणात शंका न बाळगता, आपण म्हणतो असे घडेलच असा विश्वास धरील, त्याच्या शब्दाप्रमाणे घडून येईल." ते अत्यंत सुंदर आहे के नाही? तो कोणाकडून येतो? देवाचा पुत्र ज्याची वचने…आकाश व पृथ्वी नाहितशी होतील, परंतु आता—परंतु त्याची वचने नाहितशी होणार नाही.

16 आता ते करण्याचा एकच मार्ग आहे, तुमच्याकडे योग्य उद्देश आणि योग्य हेतू असला पाहिजे. आता, जर मी येथे बाहेर गेलो, आणि म्हणालो "मी तुम्हाला दाखवीन मी ह्या डोंगराला हलवू शकतो, डोंगरा, तू उपटला जा." तो कधीच हलणार नाही. निश्चितच नाही. माझ्याकडे काय होते ह्याचे काही नाही. ते असले पाहिजे…प्रथम तुला देवाची इच्छा शोधावी लागेल.

17 तेच कारण आहे, सहसा प्रार्थना रांगेत, मला—मला फारच कठीण जाते, कारण तेथे काही गोष्टी असतात जे रांगेत निघून जातात आणि असेच, आणि तेथेच जेथे ते तुम्हाला परत भेटतात. परंतू पाहा, जर तुमच्यामध्ये काही कबुली न दिलेले पाप असते…तुम्ही कधी असे प्रकरण पाहिलेत काय, मी दुष्ट आत्म्यांना निघून जाण्यास सांगण्या, अगोदर? मी लक्ष देऊन ते प्रकरण खरेच आहे त्याची खात्री करून घेतो की त्या जीवनात असे काहीच नाही जे काही अडचणी आणतील, समजले, कारण लक्षात ठेवा, ह्या दानामुळे, तुम्ही त्यांच्या बरोबर समस्येतही सापडू शकता.

18 तुम्हाला लक्षात आहे एकदा, देवाने, एक संदेष्टा दिला…एका मनुष्यामधून, एक संदेष्टा बनवला, मोशे, आणि त्याला खाली जाण्यास सांगितले, खडकाला आज्ञा दे. आणि तो संदेष्टा उत्सुक होता, आणि बाहेर गेला, आणि खडकावर जोराने मारले, हे ख्रिस्ताच्या अशक्तपणाबद्दल बोलते, कि त्याला दुसऱ्यांदा मरावे लागेल. किंवा दुसऱ्यांदा प्रहार सहन करावा लागेल. त्याला ते आणण्याचे सामर्थ्य होते. परंतु ती देवाची इच्छा नव्हती.

19 मी कधीच विश्वास करू शकत नाही की ती देवाची इच्छा होती की एलियाने आजूबाजूस भटकावे कारण ती मुले त्याला टक्कल पडलेला म्हणून चिडवीत होती, मला वाटत नाही त्याने तसे करावे. परंतु तो एक संदेष्टा होता, आणि रागावला होता, आणि त्याने त्या मुलांना शाप दिला आणि दोन अस्वल त्या निष्पाप बेचाळीस मुलांना मारून टाकतात. समजले? परंतु मला वाटत नाही कि त्याने ते करायला हवे होते. आणि ते फक्त—फक्त…आपण…

20 परमेश्वरा, मी आज विश्वास करितो, तो त्याच्या मंडळीला सामर्थ्य देण्याअगोदर, तो प्रयत्न करितो की त्याच्या मंडळीने समजावे कि तो काय करील.

21 आपण,…पुढच्या वेळेस, जर प्रभूची इच्छा असेल जेव्हा मी परत येईन, आपल्याकडे अशा काही गोष्टीवर वेळ देऊ, काही गोष्टी ज्या घडण्याचे ठरले आहे, आणि तेव्हा आपल्याला त्याविषयी अधिक कळेल.

22 परंतु जर तुम्ही फक्त शब्द बोलाल, म्हणाल, "प्रभू, मी त्यावर विश्वास ठेवतो," शंका बाळगत नाही, तुमच्या हृदया पासून खरेपणाने बोलाल…

23 आता, उदाहरणार्थ, मी एका दरीत होतो, आणि मी…मी लाखो लोकांना प्रचार करीत आहे, परंतु तेथे डोंगराच्या पलीकडे, एक शंभर लोकांचा समूह आहे, आणि ते ख्रिस्ताच्या न ओळखीविना मरत आहेत. जरी माझ्याकडे येथे प्रचार करण्यासाठी लाख लोक आहेत, परंतु तरी, माझ्या अंत:करणात मला काहीतरी सांगत आहे, "पलीकडे त्या लोकांकडे जा. त्यांच्याकडे जा. ते नाश पावत आहेत." मला स्वतःहून तेथे जायचे नाही परंतु तरीही माझ्यामध्ये काहीतरी आहे. समजले, तेव्हा तेथे देव चालत आहे. तेथे

काय हेतू आहे पहा, तेथे जाण्याचा हेतू काय आहे, स्वतःसाठी नाही...आता, जर मी म्हणतो, "ठीक..." जर माझा तेथे जाण्याचा हेतू हा बरोबर आहे, परंतु जेव्हा मी उभा राहतो आणि येथे मोठा डोंगर आहे. मी म्हणतो, "तुला माहित आहे, जर मी त्या डोंगरावर गेलो आणि त्या सर्व शेकडो लोकांना वाचवले, कधीतरी ते तेथे भाऊ ब्रॅन्हम चा पुतळा बनवतील: एक मोठी मिशनरी." आता, माझा हेतू बरोबर नाही. डोंगर पडणार नाही. नाही महाशय.

24 परंतु जेव्हा माझा हेतू आणि उद्देश बरोबर आहेत, आणि देव मला माझ्या अंतःकरणात चालवीत आहे, आणि मी डोंगरावर, डोंगरासभोवती, डोंगरखाली जाऊ शकत नाही, मी म्हणेन, "डोंगरा बाजूला हो." कदाचित तसे...जेव्हा मी ते बोलतो, आणि अधिक नाही, तर मी ते योग्य प्रकारच्या आत्म्याने, पवित्र आत्म्याच्या प्रेरणेने, देवाच्या इच्छेप्रमाणे बोलतो, तेथे कदाचित होणार नाही, परंतु एक लहान चमचाभर डोंगर खाली पडेल, परंतू ते घडण्याच्या मार्गावर आहे. दुसऱ्या दिवशी तेथे तो दोन पाउंडाने पडला आहे. दुसऱ्या दिवशी पाव टन. आणि महिन्याभरात कदाचित, पाच टन आत पडला. ते काय आहे? तरी ते दिसून येत नाही, परंतु ती, तिच्या मार्गावर सरकत आहे. मी त्याबरोबर तेथे राहीन आणि ती गोष्ट पूर्ण होताना पाहीन, कारण देवाने तसे सांगितले आहे आणि ते घडतेच.

25 ह्या रात्री, काय तुम्ही तो तुमच्या आईविषयी विचार करू शकता? ठीक आहे, जर तुम्ही तो विचार कराल, ती बरी होईल. ते म्हणजे जर तुम्ही फक्त त्यावर विश्वास ठेवता; फक्त वचन बोलता आणि त्यासमवेत राहता. समजले? फक्त त्यावर विश्वास करा; त्यावर अवलंबून राहा. ते सार्वकालिक जीवन आहे.

26 आता, उद्या दुपारी...मी बिलीस म्हणालो, आज रात्री, प्रार्थनापत्रे देऊ नको आणि मला बोलायचे आहे. मी सत्याने कबुली देत आहे मी जानेवारी पासून परदेशी जात आहे, आणि फिनिक्सला घरी परतलो, आणि पुन्हा आणि सर्व पूर्ण झाले...ती पारख आहे... तोपर्यंत मी इतका अशक्त होतो की मला काही वेळेस मी कुठे उभा आहे समजत नाही. मोठया मुश्किलीने उभे राहण्याचीही शक्ती नसते.

27 आणि मग मला निघावे लागते ते – तुम्ही—तुम्ही बंधुजन मला आणखी काही दिवस राहण्यासाठी आमंत्रित करतात. त्याचे मी कौतुक करतो. मला निश्चितच वाटते की हा येथे चांगल्या सेवकांचा समूह आहे. आपल्याला इच्छा होते की आपण आणखी थोडा वेळ सहभागीता करू शकलो असतो. जर प्रभूची इच्छा असली, तर कधीतरी मी पुन्हा येईन.दुसरे काहीच नाही, एका मंडळीतून दुसरीकडे जातो आणि शहरभर फिरतो आणि तुम्हा सर्वांना भेटी देतो. मला ते करण्यास आवडते: काहीही जे मी देवाच्या राज्याच्या मदतीसाठी करू शकतो, ते म्हणजे, जर मी ते करावे अशी तुमची इच्छा असेल. आणि कधीतरी पुन्हा या आणि आमच्याबरोबर सहभागी व्हा आणि कुठेतरी, एक चांगली अशी सभा घ्या.

28 आणि लक्षात ठेवा, भावांनो, मी तुमच्यासाठी प्रार्थना करीत राहीन. ती एक गोष्ट निश्चित आहे आणि मला वाटते की तुम्ही सर्वांनी माझ्यासाठी प्रार्थना करावी; तुम्हा सर्वांनी.

29 आणि आता मी—मी...उद्या सकाळी ह्या शहरात सर्वत्र, ह्या सर्व निरनिराळ्या चांगल्या मंडळ्यात प्रार्थना सभा आहेत.

30 आता, जेफरसनविले मधून काही समूह येथे आले आहेत. काही माझ्या मित्रांपैकी, एक माझ्या कालिसियातील विश्वस्थ, येथे आहेत.भाऊ फ्रेड सॉथमन. मी त्याला

कधी प्रार्थनासभेत भेटू शकलो नाही. आणि भाऊ ओह..., अजून काही माझे मित्र जेफरसनविलेमधून, तेथे आहेत माझे...माझे सचिव तेथे आहेत आणि—आणि सर्वजण येथे आहेत, या सभेतच कुठेतरी. मी त्यांना अजून पाहिलेले नाही.

31 आणि बंधुजनहो या शहरात काही चांगले चर्चेस आहेत. आणि जे तुम्ही बाकीचे भेट देणारे, तुम्ही ह्या चर्चस मधील एखादे शोधा व उद्या तेथे जा. मला खात्री आहे तुम्हाला तेथे आवडेल. ते बंधुजन आहेत जे या प्रकारच्या सेवकाईवर विश्वास करतात. ह्याच कारणामुळे ते येथे या मंचावर बसलेले आहेत आणि खालीही त्यांच्या जागेवर बसलेले आहेत, कारण ते त्यावर विश्वास करतात, आणि मी अशा मनुष्यांची वाहवा करीन.

32 प्रभू, ह्या फुल गोस्पल बिझनेसमन च्या सभेला येथे आशीर्वादित कर ज्यांनी ह्या सभेचे आयोजक केले आहे. तेथे...मी विश्वास करतो ते खरे आहे, की त्यांनी सभा प्रयोजकाकडून ठरल्या. मी—मी त्यांच्या पुष्कळश्या प्रयोजकात जातो,...आम्हाला ह्याप्रकारे राहून चालणार नाही, परंतु पुष्कळ वेळा, कारण तेथे बंधुजनामध्ये काही थोडे—बहुत मतभेद असतात, जसा एखादा व्यक्ती *काहीतरी* थोडासा असा विश्वास करतो, *थोडा* दुसरा वेगळा विश्वास करतो...अशाप्रकारेच जरासा मतभेद निर्माण होतो आणि जुना फोड जो मागचा तो परत येतो. तो या वेळेपर्यंत बरा झाला पाहिजे होता, परंतु तो—तो...आणि जर तुम्हाला—जर मला फुल गोस्पल बिझनेसमॅन मिळतात, मग अशा प्रकारची मदत ते एकत्रित करते आणि आम्ही एकत्रित येतो, आणि आम्हाला एकत्रितरित्या सहभागीता करता येते, चांगली वेळ अनुभवण्यासाठी. आणि मी त्याविषयी कौतुक करतो. परमेश्वर त्या स्थानिक संघटनेच्या शाखेला आशीर्वादीत करो. मी विश्वास करतो कि प्रभुने एका उद्देशासाठी ते उभारले आहे.

33 आता...आणि तेव्हा मला एक महत्वाची संधी मिळाली, कि भाऊ ओरल रोबर्ट्सची जागा त्या दिवशी पाहण्यास मिळाली. आणि बापरे, किती प्रचंड मोठी ती जागा, इतकी आनंददायक अशी गोष्ट. ते पेंटेकॉस्टसाठी एक स्मारक आहे.

34 मग मी भाऊ टॉमी ऑस्बॉर्नकडे गेलो, ते आणखी एक विस्मयकारक ठिकाण, आश्चर्यजनक देवाचा मनुष्य जो...भाऊ टॉमी आणि मी अगदी जवळचे आहोत, आणि भाऊ ओरल, सुद्धा, अगदी निकटचे भाऊ आहोत, आणि आम्ही एकमेकांवर प्रेम करतो, आणि उत्तम कार्य करण्याचा प्रयत्न करतो की देवाच्या राज्यातील लोकांचे बरे व्हावे.

35 म्हणून नक्कीच मी त्या मनुष्यांचे कौतुक करीन की तुमच्या मध्ये ह्या शहरात इतर, जे प्रतिष्ठित व्यक्ती आहेत त्यांतील ते आहेत. तुम्हा मेंढरांना आश्चर्यकारक मेंढपाळ मिळाले आहेत. मी ते अशा प्रकारे सांगू इच्छितो. प्रभू हे असेच चालू ठेवो व तुम्हाबरोबर राहो हीच माझी प्रार्थना. आणि आता उद्या दुपारी, मी...कोणत्या वेळी सभेची सुरवात होईल, भावांनो? अडीचला. तुम्ही येथे एक—एक वाजता किंवा दीड वाजता असावे असे म्हणजे त्या बाकीच्या सभेत व्यत्यय आणणार नाहीत.

36 आणि, जर मुलांनी आधीच तुम्हाला कळविले नसेल, आज रात्री त्यांच्याकडे काही पुस्तके, चित्रे आणि असेच काही आणि टेप्स आणि रेकॉर्ड्स, आणि...सभेविषयी, आणि ते विक्री करणार आहेत. परंतु आम्ही त्यांना ते उद्या, शब्बाथ दिवशी विक्री करू देणार नाही. कोणतेही पुस्तक किंवा काहीही उद्या विकले जाणार नाहीत. म्हणून आम्ही ते करणार नाही—आम्ही त्याला अनुमती देणार नाही. जरी पुष्कळ म्हणाले, "तुम्ही फार चुकीचे करता..."

37 आणि वृद्ध डॅडी बोसवर्थ मला म्हणायचे, "ओह, भाऊ ब्रॅन्हम, येथे तू चुकत आहेस," परंतु मला त्याप्रमाणे वाटत आहे. (समजले?) आणि मला—मला वाटते. जर तुम्हांला

एक हवे आहे, परंतु परंतु जर तुम्ही...ते तुम्हाला एक देतील. परंतु आम्ही तो शब्बाथ दिवशी विकू शकत नाही. ते अंतिम आहे...जर मी तसा विश्वास करतो, तर त्याप्रमाणेच, मला जगावे लागेल...मला त्याप्रमाणेच चालावे लागेल. तुम्ही समजले? आणि मला—मला माझ्या श्रध्देप्रमाणे जगावे लागेल आणि म्हणून...किंवा तुम्ही घरी पाठवू शकता आणि, घरापर्यंत, त्या जागेवर आणि ती घ्या.

38 आता आज रात्री, ओह, तुम्ही हे विसरून जा, ओह, काही काम करावयाचे आहे किंवा असे काही, किंवा दिवसाच्या परिश्रमाविषयी. सर्व काही बाजूला सारूया, आणि वचनामध्ये काही मिनिटे पाहूया, आणि पाहूया की देव त्याच्या वचनांतून काय बोलू इच्छितो. आणि मी प्रार्थना करतो की आज रात्री देव आम्हाला अत्यंत आशीर्वादीत करो.

39 जेनी, तू हिला माझ्यासाठी दूर नेशील का? ती लहानशी मुलगी जी आहे तिला माझ्यासाठी बाजूला नेशील का? ती खरोखर सुरेख नाही का? माझ्याबरोबर माझ्या घरी येऊन माझ्या सारा बरोबर खेळशील का, तुझ्या एवढीच उंच *ती* आहे? ओह तू येशील का? मला—मला तुझ्यासाठी ते आवडेल. ती तुझ्याच उंचीची आहे. आणि ती डॅडीची छोटी मुलगी आहे. हुम—हुम हुम. आणि मी तर पैज मारतो तू—तू सुध्दा आपल्या डॅडीवर ही प्रेम करते, नाही का? मम्मी? ओह, नक्कीच तू करते. फारच सुरेख छोटी मुलगी, मी येथे बसत असताना पाहत आहे. तिचे छोटे डोळे जणू त्या कांबळीला जाळून पडलेले दोन भोकं आणि—आणि ते लहान तपकिरी केस.

40 मला लहान मुलं आवडतात. माझ्या दोन मुली आपल्या घरी आहेत त्यातील एक रेबेका आणि दुसरी एक सारा आहे.

41 काही काळा अगोदर, मी बाहेर होतो. ते डॅडीच्या लहानश्या मुली आहेत. तुम्ही जाणता, आणि मी त्यांवर प्रेम करतो. आणि जसे जसे त्या येतात मला त्यांना माझ्या पाठीवर बसून खेळवावे लागते, आणि...फक्त बेकी त्यासाठी फार मोठी झालेली आहे; माझ्याइतकी मोठी आहे. आता तर ती माझे कंबरडे मोडेल...परंतु ते कसेही असो ती अजूनही डॅडीची लहानशी मुलगी आहे. आणि आता, पुढच्या वर्षी, आमची इच्छा आहे की तिला बायबल स्कूल मध्ये कुठे तरी घालावे आणि पब्लिक स्कूल मधून काढावे.

42 आणि मग ते—तेथे डॅडीसाठी वाट पाहत होते, तुम्ही जाणता, तो घरी कधी येतो असे. मी सभेसाठी बाहेर असतो. आणि उद्या रात्री मध्यरात्रीपर्यंत मला भेटण्यासाठी ते माझ्या येण्याची वाट पाहणार आहेत. आणि म्हणून, मी तर भल्या पहाटे सुमारे 3 ते 4 वाजता आत पोहचलो. आणि आईने दरवाज्याजवळ येऊन मला आत घेतलं आणि मी तर फार...थकलेलो, आणि, भागलेला होतो, मी...ह्या मंचावर मी जेव्हा...अभिषेकाचा अनुभव घेतो मला बरे वाटते, परंतु जेव्हा तो निघून जातो, तेव्हाच तुम्ही समस्यांत सापडता. किती जणांना हे माहित आहे? का, खचितच. तसे आहे.

43 पहा. एलिया डोंगरावर गेला आणि आकाशांतून अग्नी बोलावला, आकाशातून पाऊस बोलावला, आणि तेव्हा जेव्हा आत्म्याने त्याला सोडले, तो रानात चाळीस दिवस भटकला आणि देवाला तो सापडला, गुहेत कुठेतरी खेचून आणले.

44 योना, जो खाली गेला आणि माशाच्या पोटात तीन दिवस आणि रात्री जिवंत राहिला, किनाऱ्यावर ओकून टाकले आणि सभोवती प्रचार करीत गेला.संपूर्ण शहराने पश्चाताप केला आणि देवाकडे आले. आणि जेव्हा अभिषेकाने त्याला सोडले, तो टेकडीवर गेला आणि देवाला त्याचा प्राण घेण्यास सांगितले.समजले?

45 मी विलियम काऊपर च्या कबरेजवळ उभे होतो, फार काळ झाला, नाही त्यांनी ते प्रसिद्ध स्तोत्र लिहिले जे आम्ही आमच्या प्रभुभोज सभेच्या वेळी वापरतो:

तेथे रक्ताने भरलेल्या पाण्याचा झरा आहे,
जो इम्यानुएलच्या नसांतून वाहतो,
जेथे पापी त्याखाली बुडी मारतात

46 तुम्ही कधी ऐकले कि त्याला काय...त्याला झाले? जेव्हा ईश्वरी प्रेरणेने त्याला सोडले, त्याने आत्महत्या करण्यासाठी नदी शोधण्याचा प्रयत्न केला.

47 मी जुन्या केटंकी घरापासून पलीकडे राहतो. आणि स्टीफन फोस्टर ने अमेरिकेला सर्वात प्रसिद्ध लोकसंगीत दिले. आणि जेव्हा तो लिहीत असे, प्रेरणा मिळत असे, त्या प्रेरणेने गीत लिहिले, मग जेव्हा तो त्या बाहेर येत असे, तो पिण्यास जात असे. शेवटी, नोकराला बोलावले आणि वस्तरा घेतला आणि आत्महत्या केली.

48 लोकांना माहित नाही जे लोक त्या अध्यात्मिक आयामात राहतात कशा त्रासातून जातात. आता *येथे*, तुम्हाला वाटते जणू काही तुम्ही त्या डोंगराला हलवू शकता, परंतु अभिषेक तुम्हाला सोडू दे, आणि त्या दरवाजातून तुम्ही जाता...जर तेथे तुम्हाला पकडण्यास कोणी नसेल...समजले? आणि मग काही तासासाठी तुम्ही, आश्चर्य करिता की तुम्ही कुठे आहात. आणि मग रात्रीनंतर रात्री, तुमच्यामधून उत्तम ते निघते.

49 आणि...मला तुम्हाला लहान सारा आणि रिबेकाविषयी सांगायचे आहे. म्हणून नंतरच्या सकाळी, मी झोपू शकलो नाही, आणि मी उठलो, खुर्चीत बसलो होतो, आणि काही वेळानंतर बेकी, मोठी असल्याकारणाने, तिचे पाय—सारेपेक्षा मोठे होते, आणि म्हणून बेकी धावत आली...उठली बिछान्यातून उडी मारून बाहेर आली, तिच्या लहान बहिणीला न उठवता, आणि तिथे ती पूर्ण घरातून, शक्य तितक्या धावत आली. ती म्हणत होती, “डॅडी, डॅडी...” मी माझा एक पाय बाहेर काढला, आणि तिने त्यावरून उडी मारली, व्यवस्थित तोल राखला. आधुनिक मंडळी तशाच प्रकारची आहे, तुम्हाला माहित आहे, ती खूप समयापासून शेकडो वर्षे, खेळत होती, तुम्हाला माहीत आहे. ती तिला स्वतःला सांभाळू शकली, आणि तिने तिचे हात माझ्याभोवती ठेवले आणि म्हणाली, “ओह, माझे डॅडी, माझे डॅडी...”

50 आणि लहान सारा, गोंधळून उठली. आता, मला माहीत नाही तुमची मुले असे करतात की नाही; माझी करतात. छोटीने हातानी मला खाली खेचले. आणि सारा बेकीच्या पायजम्यावर होती, तिचे पाय लांब होते, तुम्हाला माहित आहे. आणि येथे ती आली, लहान बीटी ती लहान मुलगी, पडू लागली, अडखळली. आणि ती तिथे जरा वेळाने आली. म्हणून बेकी वळली; म्हणाली, “सारा माझ्या बहिणी, मला तुला काही सांगायचे आहे.” ती म्हणाली, “मी येथे प्रथम होती. आणि माझी मक्तेदारी आहे. म्हणून डॅडी पूर्णपणे माझा आहे आणि तुझ्यासाठी काहीच राहिलेले नाही.”

51 तशाच तऱ्हेने काही लोक धर्माविषयी विचार करण्याचा प्रयत्न करतात, हो कि नाही? ते बरोबर आहे.

52 आणि ती लहान बिचारी सारा, तिने तिचे ओठ आवळले, आणि तिच्या लहान काळ्या डोळ्यांनी माझ्याकडे वर पहिले, आणि तिने रडण्यास सुरवात केली. आणि बेकी तिचे गाल माझ्या गालास लावून, मला मिठीत घेऊन होती. मी तिच्यावर प्रेम करतो.आणि सारा दूर जाऊ लागली कारण बेकी कडे डॅडी पूर्णपणे होता. मी दुसरी मांडी अशाप्रकारे बाहेर काढली आणि तिला *अशा* तऱ्हेने हालचाल करून खुणावले. ओह तिने आनंदाने लवकर आणि धावत माझ्या मांडीवर उडी मारली...ती माझ्यापासून खूप लांब नव्हती आणि तिचे पाय जमिनीवर पोहचत नव्हते. ती जराशी लटपटत होती (कदाचित, जसा मी आहे, जरासा लटपटणारा, तुम्हाला माहीत आहे.) आणि तिने...ती जमिनीला टेकू

शकत नव्हती. ती मोठा संप्रदाय नव्हती, तुम्हाला माहित आहे, आणि म्हणून ती भक्कम तळावर उतरू शकत नव्हती. ती फार लांब नव्हती.

53 आणि म्हणून, ती थोडीशी लटपटत होती, आणि मी दोन्ही हात तिच्या भोवती *असे* टाकले आणि माझ्या जवळ मिठीत घेतले, आणि तिच्या लहान काळ्या डोळ्यात चमक आली, आणि तिने पुन्हा रिबेकाकडे पहिले. ती म्हणाली, "रिबेका, माझी बहिण," ती—ती म्हणाली, "हे खरे असेल की तुझ्याकडे डॅडी पूर्णपणे आहे, परंतु मी तुला एक गोष्ट सांगू इच्छिते, मी संपूर्णतः डॅडीकडे आहे." तर...

54 तशाचप्रकारे म्हणून...मी पूर्णतः त्याच्याकडे आहे. माझ्याकडे कदाचित मोठ्या गोष्टी मांडण्यासाठी शिक्षण नसेल, परंतु फक्त जोपर्यंत मला माहीत आहे त्याच्याकडे मी पूर्णपणे आहे, माझ्या लटपटण्यात, त्याचे दोन्ही हात माझ्या भोवती असतात, ते मला खूप चांगले वाटेल.

55 ठीक, आपण वचन उघडण्यापूर्वी आपण त्याला एक छोटीशी प्रार्थना सादर करूया.

56 आता, स्वर्गीय पित्या, आम्हाला कळते की आम्ही अगदी लहान मुलांप्रमाणे आहोत. आणि—आणि तुला आमच्याबरोबर राहणे आणि आराधना करणे आवडते. आणि जेव्हा आम्ही तुझी आराधना करतो, आणि तू आम्हावर प्रेम करतोस, आणि आम्हास तुझ्या हातात पकडतोस, आणि तुझा पवित्र आत्मा खाली पाठवतोस, आणि आम्हास समजावितो कि तू जिवंत आहेस आणि तू आमचा पिता आहेस, आम्ही तुझे आभार मानतो. आता आज रात्री तुझा पवित्र आत्मा आमच्यावर येवो. प्रभो, प्रत्येक हृदयावर प्रेम कर. आम्हाला नवा आशीर्वाद दे. पित्या आमच्यावर आशीर्वाद दे. पित्या, आमच्यावर दयेचे दवबिंदू ओत. आमच्या पापांकडे पाहू नकोस. ते पुष्कळ आहेत. प्रभू; त्यांची क्षमा कर. त्यांना सोडून दे, पित्या, आणि आम्हाला फक्त तुझ्या हातांमध्ये घे, आणि—आणि आमचे आजार बरे कर. आणि—आणि आमचा आत्मा शुध्द कर, आणि आमचा प्राण मुक्त कर, प्रभू, ह्यासाठी की आम्ही तुझी उपासना आणि स्तुती करू शकू, त्या घरात सर्वत्र फिरणाऱ्या लहान लेकरांसारखे कर, ज्यांना ठाऊक असते, डॅडीचे आमच्यावर लक्ष आहे. प्रभू, ते प्रदान कर.

57 आता, कोणीही मनुष्य वचनाचा अर्थ सांगण्यास—समर्थ नाही. आपल्याला ठाऊक आहे की, योहानाने ते पुस्तक उजव्या हातात पहिले जो राजसनावर बसला होता, आणि तिथे स्वर्गात, किंवा पृथ्वीवर, किंवा पृथ्वीखाली कोणीही मनुष्य ते पुस्तक घेण्यास किंवा उघडण्यास, किंवा शिक्के फोडण्यास समर्थ नव्हता. आणि तेथे एक कोकरा आला, जो जगाच्या स्थापनेपासून वधला गेला होता. आणि तो समर्थ होता. आणि त्याने ते पुस्तक घेतले आणि शिक्के उघडले, आणि ते पुस्तक उघडले. हे कोकऱ्या, आज रात्री ये. ते पुस्तक आम्हासाठी उघड, पित्या, जेव्हा आम्ही तुझी वाट पाहतो, कारण हे आम्ही येशूच्या नावाने, जो देवाचा कोकरा, मागतो. आमेन.

58 मी आज रात्री येथे तीन शब्दांचे लहानशे शास्त्रवचन निवडले आहे. परंतु प्रथम मी संत योहनातील एक किंवा दोन वचने वाचू इच्छितो, 11 वा अध्याय 23 व्या वचनापासून

*...येशूने तिला म्हटले, तुझा भाऊ पुन्हा उठेल.*

*...मार्था त्याला म्हणाली, तो शेवटल्या दिवशी पुनरुत्थान समयी पुन्हा उठेल,...हे मला ठाऊक आहे.*

*येशूने तिला म्हटले, पुनरुत्थान व जीवन...मीच आहे: जो माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला असला तरी जगेल;*

*आणि जिवंत असलेला प्रत्येक जण जो माझ्यावर विश्वास ठेवतो तो कधीही मरणार नाही. याचा तुला विश्वास आहे का?*

*ती त्याला म्हणाली, होय प्रभुजी: जगात येणारा जो ख्रिस्त, देवाचा पुत्र, आपणच आहा, असा मी विश्वास धरला आहे.*

59 आणि वचनासाठी मी हे तीन शब्द वापरू इच्छितो: *याचा तुला विश्वास आहे का?*

60 मी काही समयाअगोदर एक गोष्ट वाचली. मला वाटते की ती एक कल्पित गोष्ट होती. आणि बुहतेक सर्व सेवकांनी, मला वाटते, डॉ.इंग्राहमचे पुस्तक,—*दावीदाच्या घराण्याचा राजकुमार* वाचले आहे. ते एक महान पुस्तक आहे. त्याचे मला वाटते त्याची पूर्णपणे छपाई बंद झाली आहे. मला तो छपाईसाठी आला तर आवडेल, ह्यासाठी कि मी तो लोकांमध्ये ठेउ शकेन.

61 आणि त्यात, मी लाजरवर एक लहानसा लेख वाचत होतो, आणि येशूवर, आणि मरिया, आणि मार्था, लाजराच्या बहिणी. आणि मी त्यात वाचत होतो की जेथे येशू राहत होता, मला वाटते, मला वाटते मार्था आणि मरीयेबरोबर. त्या दोघी सुंदर इब्रि मुली होत्या. आणि लाजर मंदिरात शास्त्री बनावा म्हणून, याजकांसाठी नियमशास्त्राची पत्रे लिहिण्यासाठी शिकत होता किंवा प्रशिक्षण घेत होता.

62 आणि येशूची खास लाजराबरोबर, महान सहभागीता होती. जेव्हा आपण त्या पुस्तकात वाचतो की तेथे तो त्यांच्या घरी येत असे आणि मार्था त्याचे वचन एकण्याविषयी थोडी मंद होती, परंतु तिला त्याचे जेवण तयार करावे लागत होते आणि मेज मांडावे लागत होते, परंतु मरिया त्याच्या चरणाशी बसत असे. आणि येशूने म्हटले मरीयेने चांगला वाटा निवडला आहे.

63 आणि तेव्हा आम्हाला सांगण्यात आले की लाजरच एक होता ज्याने येशूला योहनाकडे आणले, त्या डॉ.इंग्राहामच्या पुस्तकातील गोष्टीमध्ये, आणि...*दाविदाच्या घराण्याचा राजकुमार*. परंतु ते कदाचित खरे नसेल, मला ठाऊक नाही, परंतु, फक्त त्याच्या पार्श्वभूमीसाठी, परंतु तो त्यांच्याबरोबर रहात होता.

64 आता, आपण हे ह्या मागील आठवड्यापासून, शिकत आलो आहे, किंबहुना, येशू संत योहान 5:19 मध्ये म्हणाला, “मी...पुत्र पित्याला जे काही करिताना पाहतो त्यावाचून काहीही त्याला स्वतःहून करीता येत नाही, कारण जे काही तो करितो ते पुत्रही तसेच करितो,” समजले? “तो पित्याला काय करताना पाहतो.”

65 म्हणून ही गोष्ट खरोखरी बरोबर करण्यासाठी, पिता, परमेश्वर, त्याचा पुत्र, येशूशी बोलला असेल, आणि म्हणाला, “तुझा मित्र, लाजर मरणार आहे, परंतू ते चांगल्यासाठी होणार आहे, म्हणून तू घर सोड. दूर जा, कारण तुला त्याच्यासाठी प्रार्थना करण्यास किंवा बरे करण्यास सांगितले जाईल, आणि—आणि माझी इच्छा नाही की तू ते करावे.” जर तुम्ही त्या गोष्टीकडे लक्ष द्याल जसे आपण पुढे जातो, तुम्ही पहाल की ती त्या परम सत्याकडे नेते. म्हणून, येशू कुठलाही इशारा किंवा काही न सांगता, त्या घरापासून, दूर गेला आणि दुसरीकडे कुठे निघून गेला, त्या रात्री परत आला नाही. आणि तो दुसऱ्या काही शहरात गेला. आणि येशूने जसे ते घर सोडले, तेव्हा संकट तेथे आले.

66 आणि जेव्हा येशू तुमचे घर सोडतो, संकट त्या मार्गावर असते. फक्त लक्ष ठेवा, जेव्हा तो तुमचे घर सोडतो संकट मार्गावर असते. जेव्हा तुम्ही समाजात मिसळता आणि तुमच्या चर्चमध्ये प्रत्येक गोष्ट इतकी सुरळीत चालली आहे, जसे काही मोठ्या अशा सोळा कार कंपनी रिकेनबेकरच्या टाक्या, आणि तुम्ही येशूला त्याच्या बाहेर टाकता,

जेव्हा येशू तुमच्या चर्च बाहेर जातो, संकट मार्गावर असते. होय, महाशय, जेव्हा येशू संप्रदाय सोडतो, ते त्याला बाजूला सारतात आणि म्हणतात, "ठीक आहे, आता आम्ही विश्वास ठेवीत नाही की ह्या गोष्टी अगदी बरोबर असल्या पाहिजे," आणि तुम्ही इतर काही गोष्टी स्वीकारता, संकट त्याच्या मार्गावर असते. ते लक्षात ठेवा.

67 हे मला प्रभू येशूच्या गोष्टीची आठवण देतात जी लुकच्या पुस्तकात मिळते. तुम्हाला माहित आहे जेव्हा तो फक्त अंदाजे बारा वर्षे वयाचा मुलगा असताना, त्याचे लोक, दर वर्षी रितिरिवाजाप्रमाणे, पेंटेकोस्टच्या सणासाठी, नेतात. आणि ते यरुशलेम शहरात सणात होते आणि चांगला समय घालवीत होते. आपल्याला बायबलमध्ये सापडते, ते तीन दिवस त्याच्या शिवाय गेले. आणि त्यांनी—त्यांनी विचार केला की कदाचित, ती गोष्ट सहजतेने घेतली, की येशू त्यांच्या काही नातलगांमध्ये असेल. आता, आपण तसे करू शकत नाही. जेव्हा ते त्यांच्या नातलागाकडे ते शोधण्यासाठी आले, तो तेथे नव्हता.

68 आणि आपण हे गृहीत धरू शकत नाही, कारण आपण केवळ मेथाडिस्ट, बाप्टिस्ट, पेंटेकोस्ट आहोत आणि आपली पार्श्वभूमी आणि आपले पूर्वज महान विश्वासी होते, आपण हे सहज गृहीत धरतो, की येशू आपल्याबरोबर आहे. आपण तसे करू शकत नाही. आपला त्याच्याशी संबंध प्रत्येक दिवशी आणि प्रत्येक मिनिटात असला पाहिजे. ओह, मला ते आवडते.

69 देव आता जो आहे तो आता मला पाहिजे. माझ्या आईवडिलांकडे काय होते, माझ्या पूर्वजांकडे काय होते, ते आश्चर्यकारक होते परंतू त्यांच्याकडे जे होते ते चांगले होते. मला वाटते आपण मार्गावर अधिक पुढे आहोत.

70 आपण पाहूया तो आज काय आहे. मला मागे पहायचे नाही आणि पाहायचे नाही की श्रीमान मूडीने काय केले, कारण आपण श्रीमान मूडीपेक्षा मार्गावर अधिक पुढे आहोत. आपल्या मंडळ्यामध्ये हि समस्या आहे की आपण मागे पाहतो आणि म्हणतो, "ठीक आहे आपण पाहूया की श्रीमान जॉन वेस्लि काय म्हणाले, दुसरे कोणी काय बोलले." तेच कारण आहे की विज्ञान त्यांच्या क्षेत्रात, धर्मापेक्षा इतके पुढे आहे.

71 येथे तीनशे, वर्षांपूर्वी फ्रेंच वैज्ञानिकांनी सिध्द केले की जर तुम्ही पस्तीस मैल ताशी इतक्या भयंकर वेगाने गेलात, तर गुरुत्वाकर्षण तुम्हाला पृथ्वीवरून दूर नेते. तुम्हाला वाटते विज्ञान पुन्हा त्याच गोष्टीचा संदर्भ देईल का? ते आता एकोणीसशे मैल प्रतितासाने जात आहे आणि अजूनही जात आहेत. ते पुढे जात आहे, पहा पुढे पाहत आहेत. परंतु आपण मागे बघू इच्छितो आणि पाहतो की मूडीने काय म्हटले, सँकिने काय म्हटले; फिनि काय म्हणाला; नोक्स, केलव्हीन; त्यांच्यातले काही. जे काय त्यांनी सांगितले ते सर्व बरोबर होते. ते त्यांच्या युगासाठी होते, परंतु आपण पुढे जात आहोत.

72 माझे आजोबा बैलगाडी चालवत होते. मी फोर्ड व्ही—8 चालवत आहे. माझा मुलगा जेट विमान चालवील. आपण पुढे सरकत आहोत. तशाचप्रकारे धर्माचे झाले पाहिजे. प्रभूचे येणे अतिशय जवळ आहे. मंडळी त्यांच्या सामर्थ्यामध्ये वाढली पाहिजे. विज्ञान फक्त इतके वर चढू शकते आणि मग त्याला खाली यावेच लागते, परंतु आपल्याकडे अलक्षित स्त्रोत आहेत, ज्यांना कधीच स्पर्श करावा लागला नाही, देवाच्या अनंत सामर्थ्याचे आहेत, की आपण पुढे जात राहिलो पाहिजे. आपण आज रात्री आपल्या विशेष अधिकारांपासून लाखो मैल वंचित राहत आहोत, ख्रिस्ती लोकांचे विशेषाधिकार ज्यांचा आनंद लुटला पाहिजे होता. मला माझी लाज वाटते जेव्हा मी बाहेर पाहतो आणि संस्था, आजार, आणि समस्या ज्या चालत्या आहेत त्या पाहतो. आपली मंडळी रस्त्यावर आजाऱ्यांना बरे करीत, मेलेल्यांना उठवीत, अशुध्द आत्म्यांना काढीत, चिन्हे आणि अदभूते करीत

रस्त्यावर चालली पाहिजे होती, संपूर्ण जगाला जाणीव करून देत की येशू ख्रिस्त जीवंत आहे. आपण ते करण्याची गरज आहे.

73 तुम्ही असे का म्हणता, “श्रीमान मूडी कधीच…” श्रीमान मूडी ह्या दिवसात राहत नव्हता. ते बरोबर आहे आपण प्रभूच्या येण्याच्या दिवसात राहत आहोत. आपण फक्त हे गृहीत धरले आहे की तो आपल्या आप्त लोकांबरोबर होता. परंतु दुसऱ्या दिवशी जेव्हा आव्हान देणाऱ्याने श्रीमान ग्रॅहमला आव्हान दिले, आपल्याला समजले की तो आपल्या नातलगांमध्ये नव्हता.

74 तो त्यांना कोठे सापडला? त्यांनी येशूला कोठे शोधले?—कोठे शोधले? तेथेच जेथे त्यांनी त्याला सोडले होते. त्यांनी त्याला कोठे सोडले? पेंटेकॉस्टच्या सणात. आपण येशूला कोठे सोडतो? मंडळी कोठे सोडते? पेंटेकॉस्टच्या सणाच्या समयी. जेव्हा आपण त्या जुन्या वेळेच्या पेंटेकोस्टच्या सामर्थ्यापासून आणि पेंटेकोस्टच्या सणापासून दूर जातो, आपण येशू पासून दूर जातो. ते अगदी खरे आहे, मित्रा. आपण आपल्या विशेषाधिकार वंचित राहत आहोत. होय महाशय.

75 त्यांनी त्याला पेंटेकोस्टच्या सणाच्यावेळी सोडले, आणि तीच एक जागा आहे की मेथडिस्ट, बाप्टिस्ट, प्रेसबेटेरियन, आणि पेंटेकॉस्टल त्याला भेटतील, ते म्हणजे मागे जा जेथे तुम्ही त्याला सोडले. प्रभूचा आनंद कोठे आहे? प्रभुचे सामर्थ्य कोठे आहे? मंडळी आज विचारत आहे “इतिहासाच्या परमेश्वराचे काय—काय झाले?” तो त्याच्या लोकांनी त्याला दृश्यावर बोलावण्याची वाट पाहत आहे. परंतु ते…

76 आपण ते संप्रदायांद्वारे करू शकत नाही. आपण ते मानवशास्त्राखाली करू शकत नाही. आपण ते अंकगणीताखाली करू शकत नाही, किंवा आपण ते शिक्षणाद्वारे करू शकत नाही. आपण स्वतःला वेगळे करतो, आपल्या स्वतःला विभागतो. आपण विभागलेले नाही. आपण खचितच ख्रिस्त येशूमध्ये एक व्यक्ती आहोत, आपण सर्व ख्रिस्तामध्ये एक आहोत; आणि आपले संप्रदाय ते कधीच करणार नाहीत. जोपर्यंत ते चांगले आहे, ते करणार नाही. आपले शिक्षण हे सुवार्तेत आजपर्यंत असलेला सर्वात मोठा अडथळा आहे, ते शिक्षण आहे.

77 आपल्याला जी गरज आहे ती शिक्षणाची नाही. आपल्याला पवित्र आत्म्याचे सामर्थ्य आणि प्रत्यक्षिकाची मंडळीत ते सामर्थ्य प्रकट करण्यासाठी गरज आहे. येशूने कधीच म्हटले नाही “सर्व जगात जा आणि—आणि शिकवा.” त्याने कधीच म्हटले नाही “संपूर्ण जगात जा आणि करा…” त्याने म्हटले, “संपूर्ण जगात जा आणि सुवार्ता सांगा.” आणि सुवार्ता ही पवित्र आत्म्याचा सामर्थ्याचे, पुनरुत्थानाचे व्यक्त करण्यासाठी आहे. आपण अजूनही लाखो मैल मागे आहोत जेथे आपण असलो पाहिजे. त्यापेक्षा आपण पुढे जाऊया. आपण मागे जाऊया जेथे आपण त्याला पेंटकोस्टच्या सणात सोडले होते.

78 येशू योहानामध्ये म्हणाला, मला वाटते, 15 वा अध्याय, तो म्हणाला “मीच द्राक्षवेल आहे, तुम्ही फाटे आहा.” आता जर त्या द्राक्षवेलाने प्रथम फांदी लावली, आणि त्या फांदीतुन प्रेषितांची कृत्ये हे पुस्तक लिहिले, दुसरी फांदी दुसरे प्रेषितांच्या कृत्यांचे पुस्तक बनविल. आणि प्रत्येक फांदी जी त्या द्राक्षवेलातून येईल ती पहिली फांदी होती तशीच असेल.

79 आता, तुम्ही कलम करू शकता. आपल्याला ते माहीत आहे. मी एक लिंबूचे झाड त्यावर वेगळ्या प्रकारच्या आठ फळासह पाहिले आहे. मी संत्र्याचे झाड पाहीले आहे ज्यास ईडलिंबू, आणि लिंबू, आणि इतर सर्वकाही लागलेले आहे परंतु ते त्याच्यामध्ये कलम केलेले होते.

80 आज तीच गोष्ट आहे. आपण आपल्या कल्पनांमध्ये आपल्या संप्रदायामध्ये तयार झालेले आहोत, परंतु जर ते झाड दुसरी फळवेल वाढविल, ती अगदी मूळ द्राक्षवेलीसारखी असेल जी त्यात गेली आहे. हालेलूयाह! ओह, मंडळी एकत्र मिसळेल, परंतु आपल्याला मूळच्या सामर्थ्याची गरज आहे. आपल्याला पवित्र आत्म्याची गरज आहे, येशू ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाच्या सामर्थ्याची गरज आहे. तेच त्याने आपल्याला करण्यास सांगितले आहे.

81 "मीच द्राक्षवेल आहे, तुम्ही फाटे आहा." जर द्राक्षवेलीला अंकुर आला, आणि त्यांतून सुंदर निळी द्राक्षे आली, दुसरी द्राक्षवेल त्यांतून निघाली आहे तिच्यावरही चांगली निळी द्राक्षे येतील. जर पहिली द्राक्षवेल बाहेर आली, आणि ते पवित्र आत्म्याच्या प्रभावाखाली आले, आणि त्यांनी मोठी अद्भुते आणि चिन्हे केली, आणि त्यांची साक्ष जगाला मुद्रित केली...त्यांच्यातील पुष्कळ जणांनी. त्यांच्या स्वतःच्या साक्षीने, त्यांनी, त्यांच्या रक्ताने, त्यांनी त्यांची साक्ष सील बंद केली. ते सर्व प्रकारच्या संकटातून आणि सर्व संकटातून सुवार्ता आणण्यासाठी गेले. त्यांनी दुःख सहन केले; त्यांना मारण्यात आले; त्यांना शिक्षा करण्यात आली. "आपण स्वर्गाच्या घरी पुष्पमय बिछान्यात सहज जाऊ, परंतु दुसऱ्यांना ते बक्षीस मिळविण्यासाठी लढावे लागले, आणि रक्ताच्या समुद्रांतून पोहावे लागले?" आपण काय करण्याची अपेक्षा करतो? "मला लढले पाहिजे जर मला राज्य केले पाहिजे. प्रभू, माझे धैय वाढव." निश्चितच आपल्याला गरज आहे...

82 आपल्याला एका नवीन संप्रदायाची गरज नाही. आपल्याला नवीन चर्च इमारतीची गरज नाही. आपल्याला आज कशाची गरज आहे ती जुन्या समायातील जंगलमय प्रदेशाची, स्वच्छ निळ्या, पापास ठार मारणाऱ्या पेंटेकॉस्टल संजीवनाची, ज्याचा जन्म पेंटेकॉस्टच्या वेळी झाला होता आणि ते पुन्हा मंडळीत असेल, पुन्हा पवित्र आत्म्याचे सामर्थ्य, येशूला दृश्यावर आणण्यासाठी.

83 इतिहासाचा परमेश्वर सदैव महत्वाच्या क्षणी दृश्यावर येतो. आपल्याला त्याची गरज आहे. तीच गोष्ट आपल्या मंडळीबरोबर आहे. आपण खूप मागे जात आहोत. आपण ह्या जगाच्या फॅशन्समध्ये पडत आहोत. आणि हळू हळू, वर्षांनुवर्षे, ते मरण्यास कोमेजण्यास सुरुवात होते.

84 त्याचा छाटणीचा समय जवळ आला आहे. परमेश्वर ती पुन्हा छाटील निश्चितच. जसे मी ह्या मंचावर उभा आहे. देव तिची पुन्हा छाटणी करील ह्यासाठी कि तिने फळ द्यावे. तो ह्या जगाची कार्ये ह्या दिवसांतील एके दिवशी छाटून टाकेल. अशी विटंबना, अशा प्रकारे मंडळी धर्माच्या नावाखाली चालवीत आहे.

85 आणि आपण पाहतो. जेव्हा येशू निघाला, मृत्यू आत आला. जेव्हा येशू आपली मंडळी सोडतो, पवित्र आत्म्याचे सामर्थ्य मंडळीतुन निघून जाते, ती कमी होण्यास आणि—आणि मरण्यास सुरुवात होते. आणि त्यानंतर तेथे आणखी काही रहात नाही. आता, जेव्हा येशू निघाला, मृत्यू आत आला. ओह, किती दुःखाचा समय तो होता.

86 आणि लक्ष द्या, ते सभोवार भटकले आणि त्यांनी येशूला निरोप पाठवला, परंतु तो आला नाही. त्यांनी पुन्हा त्याला बोलवावयास पाठवले, आणि तो आला नाही, परंतु त्याला माहित होते तो काय करणार होता. त्याला आज रात्री माहीत आहे, तो आज काय करणार आहे. त्यांच्यासाठी ते हरवलेले नाही: त्याला नक्की माहित आहे त्याने काय करण्याचे ठरवले आहे.तो लोकांना उठविणार आहे, अगदी निश्चित जसे मी ह्या मंचावर उभा आहे. तो लोकांना त्याच्या नावाकरिता परराष्ट्रीय पिढीतून उठवील. तो ते करील.

87 आता यहूदयांचा समय जवळ आहे, आणि परराष्ट्रीयांचा समय संपत आहे, कारण ते केवळ बाहेर गेले आहेत. ते ख्रिस्ताला नाकारत आहेत; ते त्याची चिन्हे नाकारत आहेत; ते दैवी म्हटलेल्या सर्व गोष्टी नाकारत आहेत, आणि त्याला काही प्रकारची मनांतील विचार जाणण्याचे शास्त्र किंवा सैतानाचे सामर्थ्य म्हणून वंचना करतात आणि काही करतात... ते पवित्र आत्म्याविरुद्ध दुर्भाषण करतात. आणि त्यांना परमेश्वरापासून दूर नेतात. आणि देव त्या अल्पसंख्यांकाना घेईल, नंतर आणि एक सामर्थ्यशाली मंडळीमध्ये वाढवील. मग त्याचा आत्मा यहूद्याकडे वळविल; आणि परराष्ट्रीय मंडळीला घरी नेईल. अगदी बरोबर आहे. ती आता तयार होत आहे. ओह, कशाप्रकारे आपण जवळजवळ, अंतिम समयात आहोत.

88 येशू, त्याला माहित होते. आणि काही वेळानंतर तो म्हणाला "आपला मित्र, लाजर, झोपला आहे."

89 कारण, शिष्यांनी विचार केला तो जराशी विश्रांती घेत आहे. तो म्हणाला "बरे, जर तो झोपला आहे, तो चांगले करीत आहे."

90 म्हणून, त्याने हे...त्यांच्या शब्दात सांगितले, ह्यासाठी की ते समजतील, म्हणाला, "तो मेला आहे, आणि मी तेथे नव्हतो. म्हणून तुमच्यासाठी मला आनंद वाटतो." समजले? "तुमच्यासाठी मला आनंद वाटतो." कारण ते त्याला बरे—बरे करण्यास सांगत होते, परंतु त्याला माहित होते तो ते करू शकत नव्हता, कारण दृष्टांत अजून...त्या चार दिवसांनंतर त्याला माहित होते की तीच ती वेळ होती जी पित्याने त्याला सांगितली होती. किती सुंदर; तो कबरेपाशी म्हणाला. "हे बापा तू माझे ऐकले म्हणून, मी तुझे आभार मानतो; तरी जो लोकसमुदाय सभोवती उभा आहे त्यांच्याकरिता मी बोललो." समजले? त्याला अगोदरच माहीत होते की तो काय करणार आहे. तो म्हणाला, "मी जाऊन त्याला उठविन."

91 आता, मी एक कल्पना करू शकतो की ते लहान घर खरोखरच कोलमडून गेले, तुटले. कमावणारा गेला होता, दुःख...ओह, ते विस्मयकारक असते जेव्हा तुमच्याकडे दुःखी मन किंवा दु:खी अंतःकरण असते, आणि तेव्हा येशू प्रकट झाला, हो की नाही. मी मार्थेला बघून कल्पना करू शकतो, एक सुंदर नाजूक स्त्री तिच्या चेहऱ्यावर काळा बुरखा घातलेली, आणि नाजूक मरिया, आणि एकमेकांना पकडून, म्हणत होत्या, "आम्ही काय करणार? वडील आणि आई गेले, आणि आमचा प्रिय भाऊ...आता, आम्ही मंडळी सोडली आहे, आणि आम्हाला त्यांच्यातून बहिष्कृत केले आहे, आणि आम्ही नाझरेथच्या येशूच्या मागे येण्यासाठी बाहेर आलो. आणि तो दूर झाला आणि त्याने आम्हाला कुठेतरी, सोडले आहे."

92 मी टिकाकाराला येताना आणि म्हणताना ऐकले, "हे, तो दैवी आरोग्य देणारा कुठे आहे, तो गालीलाचा संदेष्टा कुठे आहे? आता तो कुठे आहे? समजले, जेव्हा त्याचा काहीतरी करण्याचा खरोखरीच समय आला, तेव्हा तो निघून गेला." ते तसेच आहे. पहा, देवाला तसे करायला आवडते, लोकांना तसे करू देणे, फक्त, लोकांना दाखवतो ते काय आहेत; होय, ते वास्तवात काय आहे ते दाखवण्याचा प्रयत्न करतो. त्यांना तो आशीर्वाद देतो. तो प्रकट होतो, त्याला स्वतःला दाखवतो, त्याची लोकांना ओळख देतो, केवळ हे पाहण्यासाठी की कशाप्रकारची प्रतिक्रिया ते घेतील, केवळ पाहण्यासाठी ते त्याविषयी काय करतील.

93 आता, तेव्हा आपण पाहतो, काही—काही दिवसानंतर, चार दिवसानंतर, बिचारा लाजर मेला होता. त्यांनी त्याला गाडले. दुसरा दिवस, तिसरा दिवस, चौथा दिवस...

आता, कोणीही जाणतो की तीन दिवसांनंतर कुजण्यास सुरुवात होते. प्रथम, चेहऱ्यावर नाक पडते आणि मग कुजण्यास सुरुवात होते. त्वचेचे किडे शरीर खाण्यास सुरवात करतात. त्यांनी त्याला जमिनीत गाडले, मोठी धोंड त्या गुहेच्या तोंडावर ठेवली. जेथे त्यांनी त्याला ठेवले होते. आणि प्रत्येक थोड्या वेळाने, त्या तरुण मुली तेथे जात आणि त्या कबरेजवळ गूढघे टेकत आणि रडत होत्या.

94 आणि थोड्या वेळाने बातमी सगळीकडे पसरली, "येशू आला आहे. आम्ही त्याला शहरातून फिरताना पहिले" ओह; ती लहान मार्था, जी इतकी, त्याविषयी मंद वाटत होती, तिने तेव्हा सिद्ध केले ती कशातून बनली होती. येथे ती आली. ती तेव्हा तिच्या मार्गावर येत होती, शोधत धावू लागली. मी त्यांच्यातील काहींना रस्त्यावरुन येताना बोलताना ऐकले, "ठीक, मला वाटते आता तुला पटले आहे, कि तुझा धर्म खोटा होता." तिने फक्त त्यांच्याकडे दुर्लक्ष केले आणि पुढे गेली, सर्व निंदा करणाऱ्यांच्या बाजूने पुढे गेली. ती तो दिसेपर्यंत खाली गेली, कदाचित रस्त्याच्या कोपऱ्यावर बसली असेल.

95 आता, असे दिसत होते, तिला...तिला त्यास दोष लावण्याचा अधिकार होता आणि—आणि त्यास अपशब्द बोलण्याचा. का, ती धावत गेली नाही आणि म्हणाली, "येथे बघ, येथे बघ, तू स्वतःला तू एक, संदेष्टा, देवाचा मनुष्य समजतोस. तू का आला नाहीस जेव्हा आम्ही तुला बोलावले? का, आम्हाला आता शहरामध्ये हास्याचा विषय केला आहे? आम्ही आमच्या मंडळीतुन तुझ्या मागे येण्यासाठी बाहेर निघालो." असे वाटत होते जणूकाही तिला अधिकार होता. परंतु तुम्हाला माहित आहे, जसे मी यावर प्रचार केला, *कोकरा आणि कबुतर*, जर आपण एक कोकरू आहोत, कोकरू जो प्रत्येक अधिकार जो त्याला आहे तो सोडून देतो.ते अगदी बरोबर आहे. त्याच्याकडे काहीच नसते फक्त लोकर, म्हणून त्याला ती सोडावी लागते. आणि तुम्ही प्रत्येक अधिकार सोडून देता ह्यासाठी की तुम्हाला देवाची सेवा करायची आहे. ते अगदी बरोबर आहे.

96 मी त्या स्त्रियांविषयी विचार करीत होतो ज्याप्रकारे ते हे लहान जुने वस्त्र घालीत होत्या, तुम्हाला माहित आहे, आणि त्या म्हणतात, "बरे, आम्ही—आम्ही अमेरिकन आहोत. आम्हाला वाटेल ते आम्ही करू शकतो."

97 मी म्हणालो, "ते अगदी बरोबर आहे, परंतु जर तू कोकरू आहेस, तू तुझे हक्क सोडून देशील." धूम्रपान करणे आणि तशासारख्या गोष्टी करणे, ती सर्वात वाईट गोष्ट आहे जी स्त्रीने आजपर्यंत केली आहे. ते अगदी बरोबर आहे.

98 फार काळ झाला नाही, एक युवती मला म्हणाली, माझ्याशी बोलत होती, म्हणाली, "परंतु, भाऊ ब्रॅन्हम, ते दुसऱ्या प्रकारचे कपडे बनवत नाही."

99 मी म्हणालो, "परंतु ते अजूनही शिलाई मशीन बनवितात आणि वस्तू विकतात. तेथे त्यासाठी काहीच निमित्त नाही." ते अगदी बरोबर आहे.

100 लक्षात ठेवा, कधीतरी, तुम्ही येथे तुमच्या पतीशी शुद्धतेने राहिला असाल, परंतु निश्चितच, त्याबद्दल तुम्हाला व्यभिचारासाठी उत्तर द्यावे लागेल. "जो कोणी एखाद्या स्त्रीकडे कामेच्छेने पाहतो, त्याने आपल्या मनात तिच्याशी व्यभिचार केला आहे."

101 तीच गोष्ट आज पेंटेकॉस्टल स्त्रियांबरोबर आहे, त्याचेच मला आश्चर्य वाटते. तुम्ही कसे त्या जुन्या खणलेल्या रेषेपासून दूर गेले आहात. तुमची आई कशा प्रकारे लांब केस ठेवत असे, आणि आज पेंटेकॉस्टल स्त्री मर्दी ग्रास च्या गुच्छाप्रमाणे रंग लावते, आणि त्यांचे केस कापते, आणि तशाचप्रकारे लहान कपडे घालते, अशाप्रकारे बाकीच्याही मार्गाने...बाहेर जातात आणि दुपारी आवारात, गवत कापण्यासाठी जेव्हा तेथून पुरुष येतात, बाई तुझ्या लक्षात येते, की तुला ह्या पुरुषांबरोबर व्यभिचार केल्याबद्दल उत्तर

द्यावे लागेल? तू स्वतःला त्यांच्यापुढे ह्या उद्देशाने सादर केले. हा मंडळीत आणि लोकांवर दुष्ट आत्मा आला आहे, आणि त्यांना ते माहित नाही. आंधळे आहेत आणि त्यांना ते माहित नाही ते खरे आहे.

102 तू कदाचित असे म्हणशील की मला एक सुवार्तीक म्हणून हे सांगण्याचा अधिकार नाही. ठीक आहे, मला—मला पवित्र आत्म्याच्या प्रेरणेने चालावे लागते. तेच सर्व मी सांगू इच्छितो. तू...जर मी तुला न्यायाच्या वेळी भेटलो, तर तेव्हा तुझे रक्त माझ्या हातावर घ्यावे लागणार नाही. जमिनीच्या प्रत्येक अंशापासून जो सैतानासारखा दिसतो त्यापासून दूर हो. त्यापासून दूर रहा. त्यांतून निघ. मी पर्वा करीत नाही किती टेलिव्हिजनचे तारे... तू येथे, एक टेलिव्हिजनचा तारा म्हणून नाही; तू परमेश्वराची कन्या आहेस.

103 मी दुसऱ्या सकाळी पास्टर्सच्या मंडळीत, एका वृद्ध गुलामाबद्दल प्रचार केला, ज्या वेळेस खूप वर्षापूर्वी ते गुलाम विकत होते. आणि ते येत असत आणि त्यांना लिलावात विकत असत. आणि ते लोक, ते रडत होते, आक्रोश करीत होते, कारण त्यांच्या जन्मभूमीत ते कधीच परत जाऊ शकत नाहीत. आता ते त्यांना चाबूक मारत असत. आणि ते त्यांना अशाप्रकारे विकत घेत होते जणूकाही, तुम्ही, एखादी मोटारगाडी कितीही किंमतीकरीता; विकत घेता, आणि तसे मनुष्याला विकत होते.

104 आणि एक दिवस, विकत घेणारा, दलाल, एक मोठया...मोठ्या मळ्यात येतो आणि तो म्हणतो, “तुझ्याकडे किती गुलाम विक्रीसाठी आहेत?”

105 म्हणाला, “माझ्याकडे काही देवाण घेवणीसाठी आहेत.” ते त्यांना मोठ्या प्रमाणावर घेण्याचा प्रयत्न करीत होते. त्यांचे आईवडील घ्या...त्याने ज्या स्त्रीशी विवाह केला ती नाजूक अशक्त स्त्री असेल, हे मोठे निरोगी पुरुष घ्या आणि तशा जाती उत्पन्न करा... जसे घोडे आणि प्राणी. ते कधीच बरोबर नव्हते. देवाने मनुष्य बनवला. मनुष्याने गुलाम बनवले. ह्यांची सुरुवात करणे बरोबर नव्हते, कधीच नाही. देवाची इच्छा नाही कोणी मनुष्याने गुलाम व्हावे. नाही, महाशय...आणि कोणीही नाही...लक्ष द्या काय घडले.

106 तेव्हा त्या सर्वांच्या मध्ये, हा व्यक्ती म्हणाला, “ठीक आहे, मला ह्यांच्यातले काही जण विकत घ्यायला आवडेल...” त्याने तेथे एक तरुण व्यक्तीला पहिले. ते त्यांना चाबूक मारीत नसत. त्याची हनुवटी वर, डोके वर, एका खऱ्या सभ्य पुरुषाप्रमाणे, तो सभोवर चालत होता. आणि तो दलाल म्हणाला, “मला ह्याला विकत घ्यायला आवडेल.”

107 त्याने म्हटले, “परंतु हा विक्रीसाठी नाही.”

108 तो म्हणाला, “का बरे?” म्हटले, “तो मालक आहे का?”

109 त्याने म्हटले, “नाही, तो एक गुलाम आहे.”

110 “ठीक आहे,” म्हणाला, “का? त्याला तुम्ही त्यांच्यातल्या इतरांपेक्षा अधिक चांगले खायला देता का?”

111 तो म्हणाला, “नाही, तो देखील तिथे त्या बाकीच्यांबरोबर खातो. तो एक गुलाम आहे.”

112 म्हणाला, “कशामुळे तो त्यांच्यातील बाकीच्यापेक्षा इतका वेगळा दिसतो?”

113 आणि तो मालक म्हणाला, “मी स्वतः त्यावर खूप वेळासाठी आश्चर्य केले, परंतु एक दिवस मी शोधले. जन्मभूमीत, त्याचा पिता त्या वंशाचा राजा आहे. आणि जरी तो परदेशी जन्मभूमीपासून दूर आहे, त्याला आजही ठाऊक आहे की तो एक राजाचा पुत्र आहे आणि तो स्वतःला त्याप्रमाणे वागवितो.” जर ते...जर आफ्रिकेतील राहिवाशास कळले की त्याचा पिता राजा आहे, आणि येथे तो ह्या अनोळखी देशात परदेशी आहे,

अजूनही त्याला माहित आहे की समुद्राच्या पलिकडे तो राजाचा पुत्र आहे, स्त्रियांनी आणि पुरुषांनी, त्यांनी स्वतःला कसे वागले पाहिजे जेव्हा तुम्ही परमेश्वराचे पुत्र आणि कन्या आहात? त्यासारखे वागा. निश्चितच, तुम्ही स्वतः नीट वागा; स्वतःला शुध्द करा आणि परमेश्वराचे पुत्र आणि कन्येसारखे वागा. आश्चर्य नाही, काय स्थिती आहे.

114 आपण येथे आहोत. ओह, बिचारी मार्था, धावत बाहेर आली. ती अशी दिसत होती की तिच्याकडे मार्ग—मार्ग होता की त्याच्या विरुध्द काहीतरी बोलावे. "तू माझ्या भावाकडे का आला नाही? पहा आम्ही तुझ्यासाठी काय केलेले आहे, आणि तू आम्हाला अपमानित होऊ दिलेस." बरे जर ती तशी बोलली असती तर ही गोष्ट तशाप्रकारे कधीच संपली नसती जशी ती संपली. नाही, महाशय. हाच मार्ग आहे ज्याकडे तुम्ही देवाच्या दैवि दानाकडे कशाप्रकारे पाहता. जर, देव दान पाठवतो, तुम्ही ते योग्य रीतीने हाताळले पाहिजे. जर तुम्ही त्यापासून काही मिळविण्याची अपेक्षा करता, तुम्ही त्याकडे योग्य रीतीने गेले पाहिजे. आणि—आणि मार्थेला ते ठाऊक होते. तिने कदाचित शुनेमकरीन स्त्री आणि तिच्या मुलाविषयी वाचले असेल. आणि ती...त्या शुनेमकरीन स्त्रीला माहित होते की देव एलियामध्ये होता, तो कितीतरी अधिक येशूमध्ये होता? निश्चितच.

115 म्हणून, ती वर योग्य दृष्टीकोन ठेवून गेली. ती धावत वर गेली आणि त्याच्या पायावर पडली. मला ते आवडले! त्याच्या चरणाशी पडली आणि म्हणाली, "प्रभू..." ती त्याची योग्य उपाधी आहे. तोच तो होता. तो तिचा प्रभू होता. "प्रभुजी, जर आपण येथे असता तर माझा भाऊ मेला नसता."

116 ओह, माझ्या प्रभू. ओह, मी त्याचे थोर अंतःकरण पाहून कल्पना करू शकतो की जसे त्याने त्या सुंदर स्त्रीकडे पहिले, तिच्या गालावरून अश्रू खाली वाहत होते. म्हणाली, "प्रभुजी आपण येथे असता, तर माझा भाऊ मेला नसता." पहा, ती काय बोलली. "परंतु तरी आताही, प्रभू, जरी तो मेला आहे, जरी किडे त्याच्या शरीरावर फिरत आहे, तरी आताही, प्रभू जे काही आपण देवाजवळ मागाल, ते देव आपल्याला देईल."

117 होय, तेच गुपित आहे. तुम्ही कदाचित म्हणाल, "मी प्रत्येक हॉस्पिटल मध्ये फिरलो.डॉक्टर म्हणाले मी मरणार आहे, परंतु तरी आताही, प्रभू...मी संधिवातामुळे पूर्ण पांगळा झाला आहे;मी हालचाल करू शकत नाही; परंतु तरी आताही प्रभुजी..."

118 काल रात्री त्या लहान मुलीच्या डोक्यात पाणी भरले होते, *ते* मोठे गोलाकार. तेथे तुम्ही काहीच करू शकत नाही. ते पसरले आहे आणि तिचे लहान डोके फोडेल आणि ती मरेल, "परंतु, आताही प्रभुजी..." तो आजही तोच देव आहे. तो आजही तोच प्रभू आहे. "तरी, आताही प्रभुजी..." आणि तो सर्वसमर्थ परमेश्वराच्या उजव्या हाताकडे बसला आहे, त्यागोष्टीसाठी मध्यस्ती करीत आहे ज्यासाठी आपण दावा करितो कि त्या त्याने आपल्यासाठी केल्या आहेत.

119 आता, मला धार्मिक असल्यासारखे वाटते. निश्चितच. तुम्ही कसेही मला देववेडा म्हणणारच आहात, म्हणून तुम्ही त्यापासून सुरवात कराल आणि त्या बरोबर संपवाल.

120 म्हणून, होय, महाशय, "तरी आताही प्रभू, तू जे काही देवाकडे मागशील, देव ते करील."

121 "माझ्या नावाने पित्याकडे जे काही मागाल मी ते करीन," येशूने म्हटले

122 "तरी आताही, प्रभुजी, जे काही आपण देवाजवळ मागाल, ते देव आपल्याला देईल." होय, त्याने त्याचे महान अंतःकरण बदलले असेल.

123 त्याने म्हटले, "तुझा भाऊ पुन्हा उठेल."

124 ती म्हणाली, "होय, प्रभू. तो जगेल. तो एक चांगला मनुष्य होता. तो शेवटल्या दिवशी सामान्य पुनरुत्थानसमयी उठेल." ते यहुदी सामान्य पुनरुत्थानात विश्वास करीत होते. "तो शेवटल्या दिवशी पुनरुत्थानसमयी पुन्हा उठेल."

125 त्याच्याकडे पहा. त्याने त्याला स्वतःला थोडेसे प्रकट केले तो म्हणाला, "पुनरुत्थान व जीवन मीच आहे." ओह, माझ्या प्रभू. तेथे कधीच असा एकही मनुष्य नव्हता जो असे पूर्वी म्हणू शकत होता. नंतरही तेथे एकही मनुष्य नसणार, जो ते म्हणू शकेल. "पुनरुत्थान व जीवन मीच आहे," प्रभू म्हणाला. "जो माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला असला, तरी जगेल. आणि जिवंत असलेला प्रत्येक जण जो माझ्यावर विश्वास ठेवतो तो कधीही मरणार नाही, हे तू खरे मानतेस काय?"

126 ती म्हणाली, "होय, प्रभुजी." ओह, ओह, तिला माहित होते काहीतरी घडण्याचे ठरले होते. घडायलाच हवे.

127 जेव्हा खऱ्या अंतःकरणातील विश्वासाची देवाशी भेट होते, ते दोन भाग *त्यांच्यासारखेच* एकत्र येतात. काहीतरी घडले पाहिजे होते. मी आज रात्री, ह्या प्रेक्षकांना, येशु ख्रिस्ताच्या नावात, आव्हान करतो, तुमचा विश्वास अशाप्रकारे देवाशी जोडला जावो, थोड्याच मिनिटात आपल्याला दुसरा पेंटेकॉस्ट मिळेल. ह्या शहरात ते एक संजीवन असे, तेथे ह्या देशात त्यांच्यावर ताबा ठेवण्यासाठी पुरेसे पोलीस नसतील. ते बरोबर आहे तेथे खरे संजीवन येईल, "तरी, आताही, प्रभुजी..."

128 "तरी, प्रभुजी, आम्ही *हे* केले; आम्ही *ते* केले आणि *ते* केले." तुम्ही काय केले ह्याची मी पर्वा करीत नाही, "तरी आताही, प्रभुजी..." तो तुमच्यासाठी वाट पाहत आहे की तुम्ही त्याला बोलवाल. तो..."तू हे खरे मानतेस?" निश्चितच. होय, महाशय. तरी आता, तू त्याच्याकडे जे काही मागशील...

129 "तुम्ही त्याला कोठे ठेवले आहे?" आता, तो कबरेकडे जातो. तो मनुष्य होता म्हणून रडला; तो परमेश्वर होता म्हणून मेलेल्याला उठवेल.

130 येथे काही काळ अगोदर, एक स्त्री जी एका लोकांच्या समूहातील होती...मी कधीच अशी सवय करीत नाही कोणत्यातरी संप्रदायाविषयी सांगावे. परंतु ती स्त्री...येशू दैवी होता ह्यावर त्यांचा विश्वास नव्हता. ते म्हणतात तो फक्त एक संदेष्टा होता. आता, जर तो फक्त एक संदेष्टा होता, आपण सर्व पापात आहोत. तो एकतर देव होता, देवापेक्षा कमी नव्हता, किंवा जगातील सर्वात मोठा फसविणारा होता. ते बरोबर आहे. तो मनुष्यपेक्षा अधिक होता.ती म्हणाली, "तो दैवी नव्हता"

131 आज तेथे खूप काही सामाजिक सुवार्ते बद्दल आहे; की ते येशू ख्रिस्ताला संदेष्टा बनविण्याचा प्रयत्न करितात, कारण, तो संदेष्ट्याचा देव होता. निश्चितच तो होता.

132 ती म्हणाली, "मी तुला ते तुझ्या बायबलद्वारे सिद्ध करीन, 'तो एक साधारण मनुष्य होता'"

133 मी म्हणालो "तू ते कर."

134 आणि ती म्हणाली "जेव्हा तो लाजराच्या कबरेकडे गेला, बायबल सांगते, 'तो रडला', त्याला मर्त्य असले पाहिजे किंवा तो रडू शकत नाही"

135 मी म्हणालो, "बाई, हे तुझे वचन आहे का?" मी हे म्हणताना अधार्मिक नाही, परंतु मी तुम्हाला सांगेन की मी तिला काय म्हणालो.

136 ती म्हणाली, "ते तेच आहे."

137 मी म्हणालो, “हे वक्तव्य म्हणजे कोंबडीच्या सावलीने रस्सा बनवणे ज्याद्वारे उपासमारीने मृत्यु होतो.” मी म्हणालो, “ठीक आहे, तुझ्याकडे—तुझ्याकडे अशी एकही गोष्ट नाही ज्यावर तू सिध्द करु शकते.”

138 ती म्हणाली, “का, तो रडला. ते दाखवते की तो मर्त्य होता.”

139 मी म्हणालो, “तो मर्त्य आणि अमर दोन्ही होता, तो परमेश्वर जो देहामध्ये होता”

140 ती म्हणाली, “ओह, मूर्खपणा आहे”

141 मी म्हणालो, “तो कबरेकडे रडत गेला. हे खरे आहे, परंतु जेव्हा त्याने स्वतःला ऊंचावले…” बायबल सांगते, “त्याजकडे पाहिले, तर त्याजवर मन बसेल असे त्याच्याठायी सौदर्य नव्हते.” परंतु जेव्हा त्याने त्याचे लहान खांदे मागे केले व म्हणाला, “लाजरा, बाहेर ये.” आणि एक मनूष्य, जो चार दिवस मृत होता आणि कबरेत कुजला होता, तो बाहेर आला. तेव्हा तो एका मनुष्यापेक्षा अधिक होता. मला एक मनुष्य दाखवा जो हे करून दाखवील? ते काय होते? कुजण्याला त्याचा स्वामी माहीत होता. जीवनाला त्याचा निर्माणकर्ता माहीत होता, काहीतरी घडणार होते. तो बोलला, आणि एक मनुष्य जो मृत होता आणि चार दिवस कबरेत होता, पुन्हा उठला, आणि त्याच्या पायावर उभा राहिला, आणि जगला. हालेलुयाह! तो परमेश्वर जो त्याच्या पुत्रामध्ये होता. होय, महाशय. तो परमेश्वर होता, जो त्याच्या पुत्रामधून स्वतःला प्रकट करीत होता, तो परमेश्वर बोलत होता, मनुष्य नव्हे.

142 तो एक मनुष्य होता जेव्हा त्याने त्या दिवशी त्या झाडावर काहीतरी खाण्यासाठी पाहिले. तो एक मनुष्य होता. परंतु जेव्हा त्याने पाच भाकऱ्या आणि दोन मासे घेतले आणि पाच हजारांना भोजन दिले, तो एका संदेष्ट्यापेक्षा अधिक होता. तो मनुष्यापेक्षा मोठा होता. तो एक देव—मनुष्य होता.निश्चितच.

143 तो त्या रात्री लहान नावेत मागे पडला होता, आणि समुद्र खवळला आणि बाटलीच्या बुचाप्रमाणे तेथे त्या मोठ्या समूद्रामध्ये नावेवर आदळत होता, जेव्हा समुद्रातील दहा हजार दुष्ट आत्म्यांनी प्रतिज्ञा केली की ते त्याला रात्री बुडविणार.तो एक मनुष्य होता, अशक्त आणि आजाऱ्यांसाठी प्रार्थना करून थकला होता, मागे तेथे झोपला होता; आणि वाऱ्याने त्याला हालविले नाही. जेव्हा जो झोपला होता, तो एक मनुष्य होता, परंतु जेव्हा तो उठला, त्याने त्याचा पाय नावेच्या सुकाणूवर ठेवला, वर पाहिले, आणि म्हणाला, “उगा रहा, शांत हो” आणि वारा आणि लाटांनी त्याचे ऐकले, तेव्हा तो मनुष्यापेक्षा मोठा होता. तो देव त्या मनुष्यात होता, त्याला प्रकट करीत होता. ते बरोबर आहे.

144 जेव्हा तो क्रुसावर दयेसाठी आरोळी करीत होता, तो एक मनुष्य होता जेव्हा त्याने आरोळी केली आणि म्हणाला, “मला तहान लागली आहे,” तो एक मनुष्य होता. जेव्हा तो मेला, तो एक मनुष्य होता. परंतु ईस्टरच्या सकाळी जेव्हा त्याने मृत्यु, नरक आणि कबर ह्यांचे शिक्के फोडले, आणि पुन्हा उठला, तो एका मनुष्यापेक्षा अधिक होता : तो प्रगट केलेला देव होता. एका कवीने म्हटले, यात आश्चर्य नाही;

> जिवंत असता, त्याने माझ्यावर प्रेम केले; मरताना त्याने मला
>   तारण दिले;
> पुरल्याने, त्याने माझी पापे वाहून नेली;
> उठण्याने, त्याने मुक्तपणे सर्वकाळ नीतिमान ठरविले;
> एके दिवशी तो येत आहे—ओह, गौरवी दिवस!

145 त्याने म्हटले, “कारण मी जीवंत आहे, तुम्ही सुद्धा जीवंत रहाल, याचा तूला विश्वास आहे काय?” तो काल, आज आणि युगानूयुग सारखाच आहे, याचा तूला विश्वास आहे काय? मी विश्वास करतो की पवित्र आत्मा आता येथे आहे, याचा तूला विश्वास आहे काय? मी विश्वास करतो तो आपल्या उपस्थितीने आपल्याला भरील. याचा तूला विश्वास आहे काय? मी विश्वास करतो की पवित्र आत्मा त्याची उपस्थिती ओतू इच्छितो, सर्व आजाऱ्यांना बरे करू इच्छितो, ज्या सर्व लोकांकडे तो नाही त्यांना पवित्र आत्म्याने भरू इच्छितो. याचा तूम्हाला विश्वास आहे काय? तुमच्या संपूर्ण हृदयाने विश्वास करता काय? आपण आपल्या पायांवर उभे राहू या आणि त्याला स्तुती देऊ या. मी विश्वास ठेवतो तो आपणा सर्वांवर येईल.

146 हे प्रभू परमेश्वरा, आकाश आणि पृथ्वीच्या निर्माणकर्त्या, सार्वकालिक जीवनाचा लेखक, प्रत्येक उत्तम देणगीचा दाता, आम्ही “याचा विश्वास करतो,” प्रभू. आम्ही विश्वास करतो की तू येथे ह्या सभेत आहेस. आम्ही विश्वास करतो की तू तो आहे. जो आमच्या जीवाला आशिर्वादित करतो. आम्ही विश्वास करतो की तू तुझा आत्मा आम्हावर उंडेलीत आहेस. आम्ही विश्वास करतो की, तू काल, आज, आणि युगानूयुग सारखाच आहे. आम्ही विश्वास करतो तू युगानुयुग जिवंत आहेस आणि आमची नावे कोकऱ्याच्या जीवनाच्या पुस्तकात लिहीली आहेत.सर्व आकाश आणि पृथ्वी नाहीतशी होतील, परंतु आम्ही युगानुयुग जिवंत राहू, कारण तू युगानुयुग जिवंत आहेस. प्रभू तू आम्हास त्याचे अभिवचन दिले आहे. आम्ही त्यावर आमच्या पुर्ण अंतःकरणाने विश्वास करतो. आमच्यामध्ये जे सर्व आहे, आम्ही त्यावर विश्वास ठेवतो. प्रभू. मी त्याच्यावर ‘प्रेम करतो, मी त्याच्यावर प्रेम करतो’.

147 तुम्ही त्याच्यावर विश्वास करता काय? मी विश्वास करतो की तो पवित्र आत्मा आहे. तेथे आमच्यावर कशाचा तरी वर्षाव होत आहे, याचा तूम्ही विश्वास करता काय? मी विश्वास करतो. तो आताच प्रत्येक व्यक्तीस बरे करु इच्छितो. तुम्ही ह्यावर विश्वास करता काय? तूमचे हात त्याच्याकडे उंचवा, आपल्या पायांवर उभे राहा. याचा तूला विश्वास आहे का? पवित्र आत्मा येथे आहे. हाच तो आहे! पेत्राने म्हटले, “हे ते आहे,” हे ते आहे, तो पवित्र आत्मा.

148 हे प्रभू, आकाश आणि पृथ्वीच्या निर्माणकर्त्या, तुझे सामर्थ्य आणि आशीर्वाद पाठीव, आणि तुझे चांगुलपण ह्या लोकांसाठी पाठीव.आणि त्यांची अंतःकरणे आशीर्वादित कर. आणि त्यांना कळु दे की मनुष्याचा पुत्र युगानुयुग जिवंत आहे. हे प्रभू, ते प्रदान कर. आम्ही त्यांना तुला सादर करितो. येशु ख्रिस्त, देवाचा पुत्र, त्याच्या नावाने.

149 ज्यांच्याकडे पवित्र आत्मा नाही, तुमचे हात वर करा आणि परमेश्वराची स्तुती करा. मी विश्वास करतो तो तुमच्यावर येईल.कोणीतरी तुमचे हात त्याच्यावर ठेवा, हाच समय आहे. आपण आणखी का थांबलो आहोत? हाच तो समय आहे. हा पेंटेकॉस्टचा समय आहे. देवाकडे परत येण्याचा समय आहे. देवाबरोबर नीट व्हा. पेंटेकॉस्ट! तुमचे अंतःकरण जिवंत देवाच्या सामर्थ्याने जागृत केले जावो. त्याचा आत्मा तूमच्यामध्ये येऊन फिरो, तूमच्या जीवास तृप्त करो. तो येथे रात्री मागे रात्री, आजाऱ्यांना बरे करण्यास, आंधळ्यांस दृष्टी देण्यास उपस्थित आहे, त्याच्या महान आणि पराक्रमी सामर्थ्याद्वारे. तो स्वतःला सिद्ध करतो की तो युगानुयुग सारखाच आहे. हालेल्लूयाह!

150 त्याची स्तुती करा. तुमचे हात वर करा. तूम्ही कोठे आहात ते विसरा; फक्त ओळखा की तुम्ही त्याच्या जवळपास आहात, आणि त्याचे चांगुलपण, आणि त्याचे गौरव आणि

त्याचे सामर्थ्य, आणि त्याची दया युगानुयुग राहते. तो युगानुयुग सारखा आहे. प्रभुचे नाव धन्यवादित असो. हालेल्लूयाह! हो, त्याच्या पवित्र नावाची स्तुती करा.

151 होय, किती अद्भुत, किती सामर्थी तो आहे. किती जणं तुमचे जीवन ह्या क्षणी नव्याने, देवाला समर्पित करू इच्छितात? तुमचे हात वर करा. आपण पेंटेकॉस्टकडे पाहूया. परमेश्वराच्या लोकांकडे पाहूया. मी माझे हात उभारीन. "प्रभू, हा मी आहे, मला पाठीव." प्रभू, दुताला वेदीवरील इंगळ घेऊन आणि तुझे सामर्थ्य आम्हावर पाठीव, प्रभू. देवा, तुझ्या आत्म्याच्या भरपुरीने ते प्रदान कर, हे पित्या. आमची प्रार्थना ऐक, हे प्रभू, आमची प्रार्थना ऐक, कारण विश्वासणारी लेकरे जी उभी आहेत. त्याच्या नावाची स्तुती होवो.

152 ओह, गौरवाच्या तरंगाप्रमाणे, दयेच्या दवबिंदूंचा वर्षाव होत आहे. ओह, देवाची स्तुती होवो. आमचा जीव वाट बघो. याचा तुम्हास विश्वास आहे काय? याचा तुम्ही विश्वास करता काय? हा पवित्र आत्मा आहे जो येत आहे.ही न दिसणारी शक्ती आहे जी आम्हांस देवाच्या राज्याकडे, पेंटेकॉस्टच्या आशीर्वादाकडे नेत आहे. घरी परत या. तुम्ही घरी पुन्हा यावे अशी अपेक्षा आहे. तुम्ही मौल्यवान लोक आहात. देवाची इच्छा आहे की तुम्ही तुमचे समर्पण करावे. स्त्रीयांनो, तुम्हाला शुद्ध करा. पुरुषांनो, तुम्ही स्वतःस शुद्ध करा. आपण पुन्हा देवाकडे जाऊया आणि खऱ्या शुद्ध अंतःकरणाने देवाची सेवा करूया.

153 परमेश्वराची स्तुती करा, पवित्र आत्मा बाहेर सभेमध्ये आहे. जी तूम्हाला प्रेरणा होत आहे त्याप्रमाणे करा. पवित्र आत्म्याला तुम्हावर येऊ द्या. मी सांगू शकतो असे काहीच नाही. मला आता काय सांगावे हे माहीत नाही. पवित्र आत्मा संपूर्ण इमारतीवर आहे. प्रभुचे नाव धन्यवदित असो. प्रभूची स्तूती होवो. ओह, हालेल्लूयाह! हालेल्लूयाह! प्रभूची स्तूती होवो, प्रभूची स्तूती होवो. किती अद्भुत, किती गौरवी...किती सुंदर, किती अद्भुत, परमेश्वराच्या संतांची स्तूती तुमच्या चेहऱ्यावर, पवित्र आत्म्याच्या उपस्थितीत जो येथे फिरत आहे, आणि आम्हास त्याचे गौरव ह्या मोठ्या एकदिलाच्या जमावातून जे त्या, त्याच नावाची स्तुती करीत आहेत, दाखवित आहे.

154 उजवीकडे वळा आणि कोणाबरोबरही हस्तांदोलन करा, म्हणा, "प्रभूची स्तूती होवो, भावा. प्रभूची स्तूती होवो, बहिणी." आपण आत घेऊया आणि देव आम्हाला जागृत करो. प्रभूची स्तुती होवो. ते बरोबर आहे.तुम्ही सर्व मेथोडीस्ट आणि बाप्टिस्ट आणि प्रेसबेटेरीयन, पॅन्टेकोस्टल्स आणि सेवेन्थ डे अडव्हेंटिस्टही आणि तुम्ही कोणीही असाल, एकमेकांना प्रभू परमेश्वराच्या उपस्थितीमध्ये हस्तांदोलन करा तेच ते आहे, ओह, हाल्लेलूयाह! हालेल्लूयाह! हालेल्लूयाह! ओह, मला इतका आनंद होत आहे की, मी त्यांच्यातील एक आहे. मी खूप आनंदी आहे. ओह, आडभिंती कोसळवू या, निरुपयोगी क्षुद्र गोष्टी टाकून देऊ या.महिमा! प्रभूमध्ये स्वतंत्र, त्याच्या पवित्र नावाची स्तुती करतो... प्रभुचे नाव धन्यवादीत असो. ओह, हालेल्लूयाह! प्रभूची स्तुती होवो.

155 ओह, मला हे बघण्यास खूप आवडते की, लोक एकमेकांशी हस्तांदोलन करीत आहेत आणि त्यांचे चेहरे उजळत आहेत. देवाचे सामर्थ्य म्हणत आहे, "हे तेच आहे, हे तेच आहे, आपण देवाची लेकरे आहोत. आपण सर्वजण एक मोठी मंडळी आहोत. येशू ख्रिस्तामध्ये एक महान मोठा व्यक्ती, त्याची वधु, गौरवी." प्रभूचे आगमन जवळ येत आहे.त्याचे लोक एकत्र येत आहेत आणि त्याचे प्रेम आणि उपस्थितीच्या सामर्थ्याने ते स्वतः प्रेम करीत आहे. ओह, हे स्वर्गासारखे आहे. ओह, हे चांगले आहे, आमेन.ओह, किती गौरवी, किती अद्भुत : प्रभूची उपासना आत्म्यात आणि सामर्थ्यामध्ये करीत आहेत. अशी वेळ. तोच अंत होता...सुरुवात.

156 तेथे अगदी नाही…मी भावांना म्हणालो, “बंधुजनहो, तेथे थांबण्यासाठी जागा नाही.” तेथे जागा नाही…आपण कधीच सुरूवात केली नाही, म्हणून आपण थांबत नाही. अगदी—अगदी अद्भुत…किती जणांना खरोखरी, प्रभूची उपस्थिती चांगली वाटत आहे? ओह, माझ्या प्रभू, प्रभूची उपस्थिती येथे, अद्भुत आहे.

157 आता, येथे आजाऱ्यांना आरोग्य देण्यासाठी, लोकांना बरे करण्यासाठी प्रभूची उपस्थिती आहे.फक्त त्याच्यावर विश्वास ठेवा. तुम्ही त्याच्यावर विश्वास करता का? जर आपण त्याच्यावर विश्वास करू शकलो, सर्व गोष्टी शक्य आहेत. तुम्ही त्यावर विश्वास करता काय? तुम्ही विश्वास करता की ती प्रभूची उपस्थिती आहे?

158 आता जेव्हा तुम्ही…मला फक्त काही क्षण द्या, आता फक्त काही क्षण, आणि फक्त क्षणासाठी लक्ष देऊन ऐका. मला तुम्हाला सिद्ध करू द्या की येथे पवित्र आत्मा आहे. मला तुम्हाला दाखवू द्या की, पवित्र आत्मा, तोच एक आहे जो बोलत आहे, तोच एक आहे जो गोष्टी करतो, तो जाणतो. आता, येथे किती जण आहेत जे आजारी म्हणून येथे आले आहेत. आम्हाला तुमचे हात पाहू द्या. ते जे आजारी आहेत…तेथे लोक आहेत…

159 तेथे एक मनुष्य उभा आहे. श्रीमान, तू विश्वास करतोस काय? तेथे बाहेर प्रार्थनापत्रे नाहीत, परंतु तू विश्वास करतोस की देव तूला बरे करू शकतो? तू विश्वास करतोस की तो मला तुझी समस्या सांगू शकतो? तो तूझ्या बाजूला आहे.तू येथे शस्त्रक्रियेसाठी आहे. ते बरोबर आहे. तुझे नाव श्री. कार्टराईट आहे. ते बरोबर आहे, ते बरोबर आहे? तुझे हात हालव. ठीक आहे, घरी जा. आणि बरा हो. तूला त्याची गरज पडणार नाही. तू ह्याच्यावर विश्वास करतोस?

160 तो मनुष्य जो त्याच्या हातामध्ये मुल घेऊन आहे, तू माझ्यावर देवाचा सेवक म्हणून विश्वास करतोस काय? तू विश्वास ठेवतोस की हा पवित्र आत्मा आहे? मी तुला ओळखत नाही, ते बरोबर आहे? माझ्या आयुष्यात तुला कधीच पाहिले नाही. आपण अनोळखी आहोत. तू विश्वास करतो की पवित्र आत्मा ह्या मुलाला काय झाले आहे ते मला सांगू शकतो? तिच्यावर पुरळ आहेत ते बरोबर आहे, ते बरोबर नाही का? निश्चीतच. तू येथला नाहीस. नाही. तुला पोटाचा त्रास आहे, तुला विकार आहे, तुला स्वतः ते बरोबर आहे, नाही का? तू कन्सास शहरातून आहे. ठीक आहे. मागे परत ये, येशू ख्रिस्त तुला बरे करतो. हाल्लेलूयाह! तू विश्वास ठेव. तू संपूर्ण हृदयाने विश्वास करतोस काय?

161 येथे प्रभूचा दुत ह्या लहान—लहान स्त्रीवर मागेपुढे घिरट्या घालीत आहे, जी जराशी वयस्कर, येथे उजवीकडे बसलेली आहे. तिला हर्निया झाला आहे. बहिणी, तू विश्वास ठेवतेस की, देव तुला हर्नियापासून बरे करील? तू, जिच्या टोपीवर लहान लाल फूल आहे, तुझा हात वर कर. ठीक आहे. घरी जा आणि बरी हो. आमेन. ओह, तो परमेश्वर आहे,. तो ख्रिस्त, परमेश्वराचा पुत्र आहे. तो मेलेल्यांतून उठला आहे.तो येथे आहे.

162 आता, तुमचे हात एकमेकांवर ठेवा, आणि तुम्ही प्रत्येक जण एक चांगली प्रार्थना करा, जेव्हा मी कोणाला तरी येथे येण्यास सांगत आहे. आता येथे ये.तर तुमचे हात एकमेकांवर आहेत ह्यासाठी की दाखववे की देव आरोग्य देतो, येथे माझ्याकडे एक भाऊ प्रार्थना करण्यासाठी आहे. (पुढे जा, ठीक आहे) परमेश्वराची स्तुती होवो.

***याचा तुला विश्वास आहे का?*** MAR60–0402

(Believest Thou This?)

हा संदेश, भाऊ विल्यम मिरीयन ब्रॅन्हम ह्यांच्या द्वारे, मूळ स्वरूपात इंग्रजीमध्ये, शनिवारी, 2 एप्रिल, 1960 साली, ब्रॅन्हम टॅबरनॅकल, जेफरसनविल येथे, इंडियाना, संयुक्त राज्य, अमेरिकेत प्रचार केला गेला, जो चुंबकीय टेप रेकोर्डिंग मधून घेतला गेला आहे आणि इंग्रजीमध्ये विस्तृत स्वरुपात छापला गेला आहे. हे मराठी भाषांतर, व्हॉइस ऑफ गॉड रेकॉर्डिंग्स ह्यांनी छापले आहे आणि त्याचा वाटप करण्यात आला आहे.

MARATHI

©2018 VGR, ALL RIGHTS RESERVED

VOICE OF GOD RECORDINGS, INDIA OFFICE
19 (NEW NO: 28) SHENOY ROAD, NUNGAMBAKKAM
CHENNAI 600 034, INDIA
044 28274560 • 044 28251791
india@vgroffice.org

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org

**छपाईच्या हक्काची सूचना**

संपूर्ण हक्क राखीव आहेत हे पुस्तक घरातील प्रिंन्टरवर स्वतःच्या उपयोगा करिता, किंवा दूस-यांना मोफत देण्या करिता, येशू ख्रिस्ताची सुवार्ता प्रसार करण्या करिता एक साधन म्हणून छापू शकता येईल. हे पुस्तक विकू शकता येणार नाही. किंवा फार मोठया प्रमाणावर प्रती काढण्यास मनाई आहे. किंवा वेबसाईडवर प्रसार करण्यास मनाई आहे. कोणत्याही प्रकारच्या पुर्नःप्राप्ति प्रणाली मधून नक्कल करण्यास मनाई आहे. दूस-या भाषेत भाषांतर करण्यास किंवा रक्कम गोळा करण्यास मनाई आहे. या सर्व गोष्टीं करण्याकरिता Voice of God Recodings यांची लिखित परवानगी घेणे आवश्यक आहे.

अधिक माहिती करिता किंवा इतर उपलब्ध गोष्टीं करिता कृपया संपर्क साधा.

VOICE OF GOD RECODINGS

P.O. Box 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A

www.branham.org.